# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक ५३) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार, दि.१४ फेब्रुवारी २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


## शरद पवार गटाची सर्वोच्च न्यायालयात धाव, निवडणूक आयोगाच्या निर्णयाला दिले आव्हान!

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- उपमुख्यमंत्री अजित पवार यांचाच गट खरा राष्ट्रवादी पक्ष असल्याचा निर्वाळा भारतीय निवडणूक आयोगाने दिला. ६ फेब्रुवारी रोजी दिलेल्या या निर्णयात निवडणूक आयोगाने राष्ट्रवादीचे घड्याळ हे निवडणूक चिन्हदेखील अजित पवार गटाला बहाल केले होते. दरम्यान, निवडणूक आयोगाच्या याच निर्णयाविरोधात शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

शरद पवार गटाने निवडणूक आयोगाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. आज (१३ फेब्रुवारी) त्यासाठीची रितसर प्रक्रिया पार पडण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि या पक्षाचे घड्याळ हे निवडणूक चिन्ह महाराष्ट्रातील जवळपास प्रत्येकालाच माहिती आहे. मात्र निवडणूक आयोगाने पक्ष आणि निवडणूक चिन्ह अजित पवार गटाला दिले आहे. त्यामुळे लोकसभेची निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर आलेली असताना शरद पवार गटापुढे नवा पेच निर्माण झाला आहे. अशा स्थितीत आता सर्वोच्च न्यायालय नेमका काय निर्णय देणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# अशोक चव्हाण झाले भाजपवासी



मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे माजी नेते अशोक चव्हाण यांनी मंगळवारी दुपारी मुंबईतील भाजप मुख्यालयात भाजपमध्ये रितसर प्रवेश केला. या सोहळ्याला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजपचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांच्यासह भाजपचे प्रमुख नेते उपस्थित होते. अशोक चव्हाण यांचे समर्थक माजी आमदार अमर राजूरकर यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. अशोक चव्हाण पक्षप्रवेशासाठी भाजपच्या कार्यालयात आल्यानंतर आशिष शेलार, अतुल भातखळकर यांनी त्यांचे स्वागत केले. चव्हाण यांनी भाजप मुख्यालयात पाऊल ठेवताच भाजपच्या कार्यकर्त्यांनी 'जय श्रीराम'च्या घोषणा दिल्या. त्यानंतर अशोक चव्हाण यांनी भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वाचा अर्ज भरत रितसर भाजपमध्ये प्रवेश केला.

यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी अशोक चव्हाण यांचं कौतुक केले. आज अतिशय आनंदाचा दिवस आहे. राज्यातलं एक जेष्ठ नेतृत्त्व भाजपमध्ये प्रवेश करत आहे. ज्यांनी लोकसभा, विधानसभा निवडणूक गाजवली. विविध मंत्रीपद भूषवली, दोनवेळा जे राज्याचे मुख्यमंत्री झाले, ते अशोक चव्हाण आज भारतीय जनता पक्षात प्रवेश करत आहेत, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. अशोक चव्हाणांची मदत कुठे घ्यायची आम्हाला चांगलेच माहित असल्याचेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

अशोक चव्हाण यांना राज्यसभेची उमेदवारी मिळणार का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले. फडणवीस म्हणाले की, अशोक चव्हाण यांची मदत कुठे घ्यायची हे आम्हाला माहिती आहे. अशोक चव्हाण यांचा अनुभव राहिलेला आहे त्याचा आम्ही फायदा घेऊत. राज्यसभेच्या उमेदवाराची घोषणा आमचं केंद्र करेल, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

अशोक चव्हाण यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर उपस्थित कार्यकर्त्यांना संबोधित केले. यावेळी त्यांनी भाषणाच्या सुरुवातीला आशिष शेलार यांचा उल्लेख करताना मुंबई भाजपचे अध्यक्ष ऐवजी मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष, असे म्हटले. त्यांच्या या वक्तव्यावर एकच हशा पिकला. (पान ४ वर)

### अमित शहा यांचा महाराष्ट्र दौरा रद्द

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा १५ तारखेला होणारा महाराष्ट्र आणि छत्रपती संभाजीनगर दौरा रद्द झाला आहे. हा दौरा पुढे ढकलण्यात आला असल्याची माहिती देण्यात आली आहे. या दिवशी ते महाराष्ट्रातील अकोला, जळगाव आणि छत्रपती संभाजीनगर येथे राज्यातील १५ लोकसभा मतदारसंघांतील तयारीचा आढावा घेणार होते. या दौऱ्यावेळी त्यांच्यासोबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह इतर काही महत्त्वाचे नेते उपस्थित राहणार होते. मात्र, हा दौरा रद्द करण्यात आलाय. दौरा रद्द करण्याचे कारण मात्र मिळाले नसले तरी तांत्रीक कारणास्तव शहा यांचा दौरा रद्द झाल्याचे सांगण्यात येत आहे.

# भारताची जगात विश्वबंधू म्हणून ओळख-पंतप्रधान मोदी

### तिसऱ्या टर्ममध्ये भारत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवणार; अबूधाबीतून दिले स्पष्ट संकेत



अबूधाबी दि.१३ (वृत्तसंस्था)- 'मोदींची गॅरंटी म्हणजे गॅरंटी पूर्ण होण्याची गॅरंटी असते. तिसऱ्या टर्ममध्ये मी भारताला तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवणार आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेत मोठी वाढ होत आहे. कोठेही संकट आले तर सर्वात लवकर पोहोचणाऱ्या देशांमध्ये भारताचे नाव असते', असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. ते अबूधाबीतील 'अहलान मोदी' या कार्यक्रमात बोलत होते. यावेळी हजारो भारतीय उपस्थित होते.

पीएम मोदी म्हणाले, युक्रेन, सुडानमध्ये अडकलेल्या भारतीयांना सुरक्षितपणे आणले. विदेशातील भारतीयांसाठीही सरकार दिवसरात्र काम करते. आज भारताला जग विश्वबंधू म्हणून ओळखते. आज तुम्ही मेहनत करत आहात. अबूधाबीमध्ये भारतीयांनी इतिहास रचला. युईएच्या विकासात भारताचा मोठा वाटा आहे. एकमेकांच्या विकासात दोन्हीही देशांनी एकमेकांना सहाय्य केले असल्याचेही नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले. यावेळी पीएम मोदींनी 'सीबीएसई'चे नवे कार्यालय युएईमध्ये असेल अशी घोषणाही केली आहे.

पीएम मोदींनी अबूधाबीतील या कार्यक्रमात 'भारत माता की जय' च्या जोरदार घोषणा दिल्या. शिवाय भारतात सुरु असलेल्या विकासाचा मोदींनी पाढाच वाचला आहे. कार्यक्रम संपल्यानंतर पीएम मोदी लोकांची भेट घेण्यासाठी थेट त्यांच्यामध्ये पोहोचले.

मला २०१५ ची पहिली यात्रा आठवते. मी केंद्र सरकारमध्ये सत्तेत येऊन फार कालावधी झाला नव्हता. २-३ दशकानंतर भारतीय पंतप्रधान इथे आला होता. माझ्यासाठी आंतरराष्ट्रीय (पान ४ वर)

## सर्वोच्च न्यायालयातील ठाकरे गटाच्या याचिकेवर एक मार्चला सुनावणी

नवी दिल्ली दि.१३ (वृत्तसंस्था)- शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या निकालाला ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालायात आव्हान दिले होते. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता थेट राज्यसभा निवडणुकीनंतर म्हणजेच १ मार्च २०२४ रोजी होणार आहे. सुनील प्रभू विरुद्ध एकनाथ शिंदे असे या खटल्याचे स्वरुप आहे. ठाकरे गटाकडून कपिल सिब्बल हे न्यायालयात युक्तीवाद करत आहेत. तर शिंदे गटाचे वतीने हरिश साळ्वे आणि महेश जेठमलानी यांनी युक्तीवाद केलाय. या प्रकरणी न्यायालय कोणता ऐतिहासिक निर्णय देणार याकडे सर्वांचे लक्ष आहे.

'मी कुणाला संतुष्ट करायला निकाल दिला नाही, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसारच निकाल दिला. भारतातील कोणत्याही नागरिकाला सर्वोच्च न्यायालयात जाण्याची मुभा आहे', अशी प्रतिक्रिया विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी अपात्रता प्रकरणाचा निकाल जाहीर केल्यानंतर दिली होती. नार्वेकर यांनी निकाल दिल्यानंतर ठाकरे गटाने लगेच सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. राहुल नार्वेकर यांनी शिवसेनेची २०१८ घटना गृहित धरली नाही, त्यामुळे एकनाथ शिंदे यांचे सर्व आमदार पात्र ठरवले होते. शिवाय, ठाकरे गटाचेही आमदार पात्र ठरवण्यात आले होते. ठाकरे गटाशिवाय शिंदे गटानेही मुंबई उच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली आहे.

# शेतकरी आंदोलकांवर पोलिसांनी अश्रू धुराच्या नळकांड्या फोडल्या; खनौरी सीमेवर लाठीचार्ज

अंबाला दि.१३ (वृत्तसंस्था)- शेतमालाला किमान आधारभूत किंमत मिळावी, श्एङ्ग वर कायदा करण्यात यावा, अशा विविध मागण्यांसाठी शंभू आणि जींद बॉर्डरवर शेतकऱ्यांचे आंदोलन सुरुच आहे. रात्री उशीरापर्यंत शेतकरी आणि केंद्रीय मंत्र्यांमध्ये बैठक पार पडली. मंत्र्यांनी ५ तास शेतकऱ्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, ही बैठक निष्फळ ठरली आहे. दरम्यान, शेतकऱ्यांचे आंदोलन थोपवण्यासाठी केंद्र सरकारकडून बळाचा वापर करण्यात येत आहे. आंदोलनस्थळी पोलिसांनी अश्रू धूराच्या नळकांड्या फोडल्या आहेत. शेतकऱ्यांच्या आडून कायदा आणि सुव्यवस्था बिघडवण्याऱ्या लोकांवर कडक कारवाई केली जाईल, असे सरकारने म्हटले आहे.

पंजाबहून दिल्लीला जाणाऱ्या शेतकऱ्यांनी आजचे आंदोलन संपवले आहे. शेतकरी नेते जगजित डल्लेवाल म्हणाले की, केंद्राने एकही मागणी मान्य केली नाही. प्रश्न मार्गी लागेपर्यंत आंदोलन सुरूच राहणार आहे. आज संध्याकाळ असल्याने आम्ही आंदोलन थांबवत आहोत. उद्या पुन्हा दिल्लीला जाणार असल्याचे त्यांनी म्हटले.

तत्पूर्वी, मंगळवार, १३ फेब्रुवारी रोजी दिल्लीच्या आसपासच्या सीमेवर शेतकऱ्यांच्या दिल्ली चलो मोर्चाला रोखण्यासाठी विस्तृत व्यवस्था करण्यात आली होती. पंजाब-हरियाणाच्या शंभू सीमेवर बॅरिकेडिंग तोडण्याचा प्रयत्न करण्यात आला तेव्हा पोलिसांनी ड्रोनमधून अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. हरियाणात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी बॅरिकेड्स हटवले.

हरियाणातील ७ आणि राजस्थानच्या ३ जिल्ह्यांमध्ये इंटरनेट बंद आहे. १५ जिल्ह्यांमध्ये कलम १४४ लागू आहे. हरियाणाची सिंघू-टिकरी सीमा आणि यूपीशी जोडलेली दिल्ली, गाझीपूर सीमा सील करण्यात आली आहे. दिल्लीतही कडक बंदोबस्त आहे. येथे एक महिन्यासाठी कलम १४४ लागू करण्यात आले होते.

हरियाणाची सिंघू-टिकरी सीमा आणि यूपीशी जोडलेली दिल्ली, गाझीपूर सीमा सील करण्यात आली आहे. दिल्लीतही कडक बंदोबस्त आहे. येथे एका महिन्यासाठी कलम १४४ लागू करण्यात आले आहे. गर्दी जमवण्यास आणि ट्रॅक्टरच्या प्रवेशावर बंदी घालण्यात आली आहे. किसान मजदूर मोर्चाचे निमंत्रक सर्वनसिंग पंढेर म्हणाले, सरकार शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत गंभीर नाही. त्यांच्या मनात काहीतरी गडबड आहे. त्यांना फक्त वेळ (पान ४ वर)

## अश्रुधुरांचा परतावा शेतकरी व्याजासह देतील-विजय वडेट्टीवार

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- विविध मागण्यासाठी दिल्लीकडे कूच करणाऱ्या शेतकऱ्यांवर केंद्र सरकारच्या वतीने लाठीचार्ज करण्यात येत असल्याचा आरोप काँग्रेसचे विधानसभेतील विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. आपल्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या शेतकऱ्यांवर मोदी सरकार अश्रुधुराचा मारा करत असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. देशातील शेतकरी हे सगळे बघत असून या अश्रुधुरांचा परतावा ते केंद्र सरकारला व्याजासह देतील, अशी टीका देखील विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

पंजाब मधील शेतकरी मंगळवारी दिल्ली चलो मार्चसाठी रवाना झाले आहेत. त्यामुळे दिल्ली जवळच्या सीमेवर शेतकऱ्यांना रोखण्यासाठी केंद्र सरकारच्या वतीने बॅरीकेट्स लावण्यात आले आहेत. यावेळी पोलिसांनी ड्रोन मधून अश्रुधुरांच्या नळकांड्या फोडून शेतकऱ्यांना रोखण्याचा प्रवेश केला. हरियाणात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी बॅरिकेट देखील हटवले आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी आणि भाजप सरकारवर जोरदार हल्ला चढवला.

या संदर्भात विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर जोरदार टीका केली. या विषयी त्यांनी केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, 'शेतकरी (पान ४ वर)

## ज्या मातीत सोनं उगवतात त्याच मातीत शेतकऱ्यांनी सरकारला गाडावे; उद्धव ठाकरे

श्रीरामपूर दि.१३ (प्रतिनिधी)- पाकिस्तान आणि चीनच्या सीमेवर सैनिक पाहिजे ते दिल्लीत आहेत, त्यांचे आई वडील शेतकरी आहेत. त्यांना रोखतात, मोठी भिंत लावतात. खिळे टाकतात. ज्या मातीत सोनं उगवतात त्याच मातीत शेतकऱ्यांनी सरकारला गाडावे, अशी घणाघाती टीका शिवसेना ठाकरे गटाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली आहे. श्रीरामपूर येथे ठाकरे गटाच्या संवाद मेळाव्यात ते बोलत होते.

उद्धव ठाकरे म्हणाले, हा कुटुंब संवाद दौरा आहे. आता कुटुंब संवाद म्हटल्यावर कुटुंबाची काळजी घेणं आलंच. करोना काळात आपण 'माझं कुटुंब, माझी जबाबदारी' ही संकल्पना राबवली होती. या योजनेला सर्वांनी साथ दिली. आता करोना नाहीये, परंतु, एक वेगळा व्हायरस (विषाणू) देशात पसरतोय. एकाधिकारशाहीचा आणि हुकूमशाहीचा व्हायरस देशभर पसरू लागला आहे. करोनाच्या बाबतीत एक नियम होताष्ठ मास्क लावा, हात धुवा आणि एकमेकांपासून दोन हात लांब राहा. तशीच विनंती तुम्हाला करण्यासाठी मी इथे आलो आहे. देशात हुकूमशाहाचा व्हायरस पसरतोय, त्या व्हायरसपासून दोन हात दूर राहा. तसेच त्या व्हायरसच्या हात धुवून मागे लागा. आपल्याला त्याला महाराष्ट्रातून संपवून टाकायचं आहे.

आज एक भ्रष्टाचारी भाजपमध्ये आला हा भाजपलाच धक्का आहे. काँग्रेस आणि महाविकास आघाडीला नाही. शिवसेनेला धक्का नाही बसला, असे धक्के आम्ही अनेक पचवले आहेत. सडलेले पान झडली गेली आणि नवी कोंब फुटतात. भ्रष्टाचाराचे आरोप करायचे आणि खासदारकी, उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्रीपद द्यायचे हीच मोदी गॅरंटी आहे का? असा सवाल उद्धव ठाकरेंनी उपस्थित केला.

### भाजपमध्ये घरवापसी नाहीच-एकनाथ खडसे

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे हे स्वगृही म्हणजे भाजपमध्ये परतणार असल्याची जोरदार चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरु आहे. भाजपचे आमदार आणि देवेंद्र फडणवीसांचे विश्वासू सहकारी अशी ओळख असलेल्या गिरीश महाजन यांनी स्वत:च तसा दावा केला होता. एकनाथ खडसे थेट दिल्लीतील भाजप नेतृत्त्वाच्या संपर्कात असल्याचे गिरीश महाजन यांनी म्हटले होते. त्यामुळे एकनाथ खडसे यांच्याविषयी संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर एकनाथ खडसे यांनी सोशल मीडियावर पोस्ट टाकत आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

एकनाथ खडसे यांनी आपल्या पोस्टच्या माध्यमातून भाजपमध्ये जाण्याच्या चर्चांना पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी म्हटले आहे की, गेले काही दिवसांपासून मी भाजपामध्ये प्रवेश करणार, अशा अफवा माझ्याबद्दल संभ्रम निर्माण व्हावा, या हेतून पसरविल्या जात आहेत. मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षात आहे व राहणार. कार्यकर्त्यांनी, आणि नागरिकांनी अशा अफवांकडे दुर्लक्ष करावे, असे आवाहन एकनाथ खडसे यांनी केले आहे.

## महाराष्ट्रात मोदींच्या सभा होऊ देणार नाही

### मनोज जरांगेंचा शासनाच्या शिष्टमंडळाला इशारा

जालना दि.१३ (प्रतिनिधी)- मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला मोठा इशारा दिला आहे. महाराष्ट्र सरकारने मागण्या मान्य केल्या नाहीत तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची एकही सभा महाराष्ट्रात होऊ देणार नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. जरांगे पाटील यांना शासनाचे शिष्टमंडळ भेटायला गेले होते. त्यावेळी त्यांनी हा इशारा दिला. जरांगे यांचा आजचा उपोषणाचा चौथा दिवस आहे.

मनोज जरांगे यांचे चौथ्या दिवशीसुद्धा उपोषण सुरू आहे. त्यांची प्रकृती खालावली आहे. त्यांना सरकारकडून उपोषण मागे घेण्याची विनंती केली जात आहे. पण ते उपोषण मागे घेण्यास तयार नाहीत. जरांगे पाटील यांना भेटण्यासाठी आज विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड, जालना जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल हे गेले. त्यांनी मनोज जरांगे यांना पाणी पिण्याचं आणि उपोषण मागे घेण्याची विनंती केली. पण ते उपोषण मागे घेण्यास तयार नाहीत.

याउलट त्यांनी सरकारला पंतप्रधान मोदींच्या सभा होऊ देणार नाही, असा इशारा दिलाय. काय नुसतं चाललं आहे, मजा चालली आहे. तुम्हाला मराठ्यांना खेटायचंय? बेसावध राहू नका. महाराष्ट्रात आम्ही पंतप्रधानांच्या सभा होऊ देणार नाहीत, असे जरांगे यांनी शिष्टमंडळासमोर इशारा दिला आहे.

## समीर वानखेडे यांची उच्च न्यायालयात धाव

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- समीर वानखेडे यांच्यावर सक्तवसुली संचनयालाने अर्थात ईडीने काही दिवसांपूर्वी कारवाई करत गुन्हा दाखल केला होता. दरम्यान, आता समीर वानखेडे यांनी पुढचं पाऊल टाकत उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. ईडीने दाखल केलेल्या गुन्ह्याचा तपास दिल्लीला वर्ग केल्याची माहिती न्यायालयात देण्यात आली होती. हा तपास दिल्लीला वर्ग करणे चुकीचे आहे, असा दावा समीर वानखेडे यांनी केला आहे. समीर वानखेडे यांनी दाखल केलेल्या या याचिकेवर १५ फेब्रुवारी रोजी सुनावणी होणार आहे.

अभिनेता शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान याला ड्रग्ज प्रकरणात अटक केल्यानंतर समीर वानखेडे चर्चेत आले होते. शिवाय, लाच घेतल्याचे आरोपही समीर वानखेडे अडकले होते. या प्रकरणात ईडीकडून त्यांची चौकशी करण्यात आली होती. दरम्यान, न्यायालयाकडून समीर वानखेंना दिलासा मिळणार का? याबाबत चर्चा सुरु आहे.

# सच्चा शिपाई कधी मैदान सोडत नाही

### काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चन्नीथला यांचे टीकास्त्र

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- काँग्रेसचा हात सोडून भाजपचं कमळ हाती घेतल्यानंतर अशोक चव्हाण यांच्यावर काँग्रेसने टीकास्त्र सोडलं. एवढे भित्रे असू नये, जो सच्चा शिपाई असतो, तो मैदान सोडत नाही, असा हल्लाबोल काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चन्नीथला यांनी केला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह बड्या नेत्यांची आज बैठक झाली. या बैठकीनंतर सर्वांनी मिळून पत्रकार परिषद घेऊन, अशोक चव्हाणांवर हल्लाबोल केला. अशोक चव्हाण यांना काँग्रेसने काय कमी केलं? दोन वेळा मुख्यमंत्री, १४-१५ वर्ष मंत्रिपद मिळालं, प्रदेश काँग्रेस कमिटीचं सदस्य, आमदारकी, खासदारकी दिली. अशोक चव्हाणांनी काँग्रेस का सोडली त्यांनी कारण सांगावं. महाराष्ट्रात महाविकास आघाडी मजबूत आहे. भाजपच्या फोडाफोडीच्या राजकारणाला जनता माफ करणार नाही, असं रमेश चन्नीथला म्हणाले.

महाराष्ट्र काँग्रेस प्रदेश कमिटीच्या सर्व नेत्यासोबत चर्चा केली. काँग्रेस मधून अशोक चव्हाण सोडून कोणीही जाणार नाही. परवा दुपारी २ वाजेपर्यंत अशोक चव्हाण आमच्यासोबत बैठकीला उपस्थित होते पण आम्हला काही बोलले नाहीत. त्यांनी काँग्रेस का सोडलं? त्यांचे डे कुठलेही कारण नाही. काँग्रेसमध्ये त्यांना अनेक पदे देण्यात आली. मुख्यमंत्री पद त्यांना देण्यात आलं. असे पक्ष सोडून जाणाऱ्यांना जनता स्वीकार (पान ४ वर)

## अशोक चव्हाण यांनी पुन्हा काँग्रेसमध्ये यावे; नाना पटोले यांची ऑफर

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- अशोक चव्हाण यांना कायम नेतृत्व करण्याची इच्छा राहिली आहे. त्यामुळे काँग्रेसने त्यांना कायमच नेतृत्व करण्याची संधी दिली आहे. एक वेळा नाही तर दोन वेळा त्यांना राज्याचे मुख्यमंत्री केले आहे. मात्र, आता भाजपमध्ये त्यांना मागच्या रांगेत बसावे लागेल. त्यामुळे अत्यंत वाईट परिस्थिती त्यांच्यावर येणार आहे. त्यामुळे त्यांनी निर्णय बदलून घ्यावा, अजूनही काही बिघडलेले नाही, त्यामुळे त्यांना आमची नम्र विनंती आहे की, त्यांनी पुन्हा निर्णय बदलावा, अशी थेट ऑफरच महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी अशोक चव्हाण यांना दिली आहे.अशोक चव्हाण हे काँग्रेस विसरू शकत नाही. आम्ही आमचा माणूस भाजपचे नेते आमच्याकडे आणण्यासाठी पाठवला आहे. म्हणूनच ते आशिष शेलार यांना मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष म्हणाले. त्यांचा स्वभाव मला माहिती असल्याचे नाना पटोले यांनी म्हटले आहे.

## 'व्हॅलेंटाईन डे' : 'लव्ह जिहाद'च्या धर्मांतराच्या षडयंत्राला वृद्धींगत करणारा दिवस !

**आमच्या** देशात प्रेमाचा एवढा भीषण दुष्काळ पडला होता की, कुणीतरी 'व्हॅलेंटाईन' नावाची व्यक्ती आली आणि आम्हाला प्रेम व्यक्त करण्याचा दिवस सांगून निघून गेली. काही देशांमध्ये १४ फेब्रुवारी या दिवशी 'व्हॅलेंटाईन डे', म्हणजे 'प्रेमदिवस' साजरा केला जातो. सध्या आमच्या देशाच्या युवा पिढीतही या दिवसाचे मोठे आकर्षण आहे. याला कुणी पश्चिमी विकृती म्हणून विरोध केला, तर वादविवाद होऊ लागते, 'आम्हाला 'नैतिकतेचे धडे' शिकवू नका ! आजची युवा पिढी योग्य-अयोग्य जाणते, तिला शिकवण्याची काही आवश्यकताच नाही. आम्हाला आता आधुनिक व्हावेच लागेल. प्रेमासाठी धर्म कशाला बघायचा ?'; परंतु अधिकांश लोक वास्तविकता जाणतच नाहीत. त्यामुळे आधी आपण हे जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे की, व्हॅलेंटाईन कोण होता ? त्याचा इतिहास काय आहे ? भारतात त्याच्या नावाने हा दिवस का साजरा केला जातो ?

**१. 'व्हॅलेंटाईन डे' साजरा करणे म्हणजे मानसिक आणि सांस्कृतिक धर्मांतर करणेच होय !**

'व्हॅलेंटाईन डे' साजरा करणे, म्हणजे पाश्चात्त्य लोकांच्या अनैतिक आचरणाचे अनुकरण करणे आणि हिंदु संस्कृतीचे अवमूल्यन करणे अन् संस्कृतीला तिलांजली देणे होय. पाश्चात्त्य परंपरेच्या अंधानुकरणामुळे आमची मुले आपल्या संस्कृतीपासून कापली जात आहेत. हिंदु सण-उत्सव धर्माशी निगडीत असून ते नैतिकता अन् सदाचार यांचे शिक्षण देतात; परंतु पाश्चात्त्य प्रथा या अनैतिकता आणि व्यभिचार यांचे शिक्षण देतात. आपण जर आपली श्रेष्ठ संस्कृती सोडून इतर धर्मांच्या प्रथा-परंपरांचे अनुकरण करू लागलो, तर त्यातून मानसिक आणि सांस्कृतिक धर्मांतरच होते.

**२. सैन्यदलात अधिकारी अल्प असण्यामागील कारण**

भारतीय सैन्यात योग्य अधिकारी अल्प आहेत; कारण आजच्या युवा वर्गाचे शारीरिक आणि मानसिक बळ वाढण्याऐवजी ते बाह्य सौंदर्य अन् थाटामाटाच्या मागे लागून वेडे झालेले आहेत.

**३. युवा वर्गाने राष्ट्रीय दायित्वाविषयी निष्काळजी होऊ नये ! –** जेव्हा इंग्लंडच्या सेनेने युद्धात फ्रान्सचा दारूण पराभव केला, तेव्हा काही विद्वानांनी टीका केली होती की, फ्रान्सचा पराजय युद्धभूमीत झाला नसून पॅरिसच्या 'डान्सबार'मुळे झाला आहे; कारण त्या वेळी फ्रान्सचा युवा वर्ग डान्सबारच्या जाळ्यात फसला होता आणि आपल्या राष्ट्रीय दायित्वाविषयी अत्यंत निष्काळजी झाला होता. भविष्यात आपल्यालाही कधी याच्याशी मिळत्या-जुळत्या टिकेला सामोरे जावे लागले, तर तो दिवस भारतासाठी अत्यंत दुर्भाग्याचा ठरेल.

**४. देशाला विनाशाच्या गर्तेत जाण्यापासून वाचवा !**

देशाचे कर्णधार, राजकीय नेते, विचारवंत, साहित्यिक, वर्तमानपत्र, वृत्तवाहिन्या आणि शिक्षक वर्ग यांनी अयोग्य पश्चिमी परंपरेच्या विनाशकारी परिणामांना ओळखावे अन् त्या थांबवण्याचा प्रयत्न करावा. हे कार्य केवळ कायदा करून होणार नाही, तर नवीन पिढीला धर्मशिक्षण देणे आणि मार्गदर्शन करणे यांतूनच होईल. या विकृतीला थांबवल्याविना युवा पिढीला आणि परिणामस्वरूप देशाला विनाशाच्या गर्तेत जाण्यापासून वाचवण्यासाठी दुसरा कोणताच उपाय नाही. यामध्ये जेवढा अधिक विलंब होईल, त्याचा परिणाम तेवढाच भयावह होईल.

**५. 'लव्ह जिहाद'चे भीषण संकट !**

हिंदूंना भयानक संकटाला ओळखणे आवश्यक आहे, ते संकट म्हणजे 'लव्ह जिहाद' ! 'लव्ह जिहाद' हा आतंकवादाचाच एक प्रकार आहे. राष्ट्रीय नेमबाज तारा सचदेवसारख्या राष्ट्रीय पातळीवरील सुपरिचित हिंदु युवतीलाही या षड्यंत्रात फसवले गेले. या घटनेला सर्वांनी दूरचित्रवाहिनीवर पाहिलेच असेल. 'लव्ह जिहाद'शी जोडलेल्या निकिता तोमरसारख्या अनेक घटना समोर येतात. त्यामुळे लव्ह जिहादच्या संदर्भात भाजपचे नेते आणि उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी त्या विरोधात कायदाही आणला आहे.

**५ अ. 'लव्ह जिहाद' म्हणजे फसवणूकच ! :** इस्लाममध्ये 'जिहाद' शब्दाचा अर्थ 'धर्माच्या रक्षणासाठी युद्ध करणे', असा होतो. वर्तमानकाळात लव्ह जिहादचा अर्थ आहे, विवाह किंवा प्रेमाचे आमीष दाखवून इस्लाममध्ये धर्मांतर करून घेणे आणि संबंधित युवतीचे शोषण करणे. 'लव्ह जिहाद' ही फसवणूक आहे. त्या नावाखाली एखादा मुसलमान युवक किंवा माणूस कोणत्याही गैरमुस्लिम युवती किंवा महिला यांच्याशी खोटे बोलून, महागड्या भेटवस्तू देऊन प्रेमाच्या जाळ्यात फसवतात आणि नंतर तिची खासगी छायाचित्रे काढून असाहाय्य बनवून तिला मुसलमान होण्यासाठी विवश केले जाते.

**५ आ. हिंदु युवतींना धर्मभ्रष्ट करणारा 'लव्ह जिहाद' ! :** 'व्हॅलेंटाईन डे' हा दिवस या जिहादी विचारसरणीच्या तरुणांसाठी लव्ह जिहादची मोठी संधीच असते. 'व्हॅलेंटाईन डे'चे निमित्त करून हिंदु युवतींना प्रेमाच्या जाळ्यात फसवण्यासाठी जिहादी युवक गुलाबाचे फूल, शुभेच्छापत्र किंवा भेटवस्तू देतात. 'व्हॅलेंटाईन डे'च्या माध्यमातून हिंदु युवतींना धर्मभ्रष्ट करणारा 'लव्ह जिहाद' काय आहे, याविषयी या घरातील सदस्य, नातेवाईक आणि ओळखीच्या भगिनी यांना जागृत केले पाहिजे. याविषयीची माहिती आपल्याला मुली आणि मैत्रिणी यांनाही समजावून सांगावे. 'व्हॅलेंटाईन डे'मुळे एक दिवस मजा वाटते; परंतु भविष्यात जन्मभर जे दुःख सहन करावे लागते, त्याची कल्पनाही करता येत नाही.

**५ इ. 'लव्ह जिहाद'शी संबंधित प्रकरणे ! :** वर्ष २००९ मध्ये केरळ उच्च न्यायालयात कार्यरत न्यायमूर्ती के.टी. शंकरन् यांना केरळ आणि मंगळूरू येथे बळजोरीने धर्मांतर केले जाणार असल्याविषयी काही संकेत मिळाले होते. त्यांनी केरळ सरकारला अशा घटना रोखण्यासाठी कायदेशीर कारवाई करण्यास सांगितले. न्यायालयाने म्हटले होते, 'प्रेमाच्या नावावर एखाद्याला फसवून किंवा इच्छेविरुद्ध धर्मांतर करण्यासाठी भाग पाडू नये.' एका खटल्यात एका युवतीचे इस्लाममध्ये धर्मांतर करण्याविषयीचे आरोप त्यात लावले होते. विशेष शाखेच्या अहवालावरून बातमी आली होती की, केरळच्या काही संघटना, काही शहरे, विशेषतः महाविद्यालयात योजनाबद्धरित्या हिंदु आणि ख्रिस्ती तरुणींसमवेत इस्लाममध्ये धर्मांतर करण्यासाठी 'प्रेमाचे नाटक' करण्याचा खेळ खेळला जात होता.

राष्ट्रीय स्तरावरील नेमबाज तारा सचदेवने उघडपणे म्हटले होते की, तिच्या सासरच्या लोकांनी इस्लाम मान्य करण्यासाठी तिचा पुष्कळ छळ केला होता. ताराने म्हटले होते की, तिने ज्या व्यक्तीशी विवाह केला होता, तिच्या प्रियकराने स्वतःचे नाव 'रणजितसिंह कोहली' म्हणजे हिंदु नाव सांगितले होते; परंतु ते खोटे होते आणि त्याचे खरे नाव 'रकिबुल हसन' असे होते. या प्रकरणात 'सीबीआय'ने चौकशी केली आणि पीडितेच्या पतीसमवेत सासरच्या लोकांविरुद्ध तक्रार प्रविष्ट (दाखल) केली होती.

**६. 'मातृ-पितृ पूजनदिन' साजरा करा !**

'व्हॅलेंटाईन डे' नावाचा अनाचार रोखण्यासाठी 'योग वेदांत सेवा समिती' यांसारख्या काही सामाजिक संस्था काही वर्षांपासून 'मातृ-पितृ पूजनदिना'चे आयोजन करत आहेत. 'मातृ-पितृ पूजनदिन' साजरा करण्यामुळे आई-वडिलांशी चांगले वागले पाहिजे आणि त्यांचा सन्मान केला पाहिजे, हे लक्षात येते.

**'व्हॅलेंटाईन डे'च्या विरोधात प्रबोधन करून संस्कृतीरक्षण कसे करावे ?**

अ. 'व्हॅलेंटाईन डे' साजरा करू नये, यासाठी शाळा, महाविद्यालय आणि खासगी शिकवणीवर्ग येथे जाऊन शिक्षक अन् विद्यार्थी यांचे प्रबोधन करावे !

आ. 'व्हॅलेंटाईन डे'ला प्रोत्साहन देणाऱ्या प्रसारमाध्यमांचा वैध मार्गाने निषेध करावा !

इ. 'व्हॅलेंटाईन डे'च्या विरोधात प्रबोधन करण्यासाठी व्हॉट्स?प, फेसबुक, ट्विटर, लघुसंदेश या माध्यमांतून प्रसार करावा आणि याविषयीच्या हस्तपत्रकांचे वितरण करावे !

ई. एखादी मोहीम ठरवली असल्यास तिची माहिती प्रथम करून घ्यावी आणि त्यानुसार संबंधित विषय सांगावा. इतरांना सहभागी होण्यासाठी आवाहन करावे.

उ. वार्षिक अभियानांच्या सूचीनुसार अभियान चालवावे, स्थानिक विषयानुसार अन्य अभियान चालवावे.

# व्हेलेंटाईन डे साजरा करतांना भारतीय संस्कृती जपावी

**आजच्या** सोशल मीडियाच्या युगात युवा पिढीमध्ये भारतीय संस्कृतीचा विसर पडत असल्याचे मोठ्या प्रमाणात दिसून येते.१४ फेब्रुवारी म्हटले की युगलांमध्ये मोठी उत्सुकता दिसून येते.परंतु यात ते भारतीय संस्कृतीचे भान विसरतांना दीसतात.जगात संपूर्ण देश आप-आपल्या संस्कृतीची जोपासना करतात.परंतु बदलत्या काळात सध्या भारतीय युवा वर्ग पाश्चिमात्य देशांमधील संस्कृतीकडे वळतांना दीसतात.ही अत्यंत गंभीर आणि चिंतेची बाब आहे.भारत आपल्या संस्कृतीच्या बळावर अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करीत आहे व जगात तिसरी महाशक्तीच्या रूपात वर येत असतांना पाश्चिमात्य संस्कृतीचा अवलंब करणे भारतासारख्या सुसंस्कृत लोकशाही देशाला घातक ठरू शकते.१४ फेब्रुवारीला व्हेलेंटाईन डे संपूर्ण जगासह भारतीय युगल मोठ्या थाटामाटात साजरा करतात.परंतु हा दीवस संपूर्णपणे भारतीय संस्कृतीच्या विरोधात असल्याचे मी समजतो.व्हेलेंटाईन डे साजरा करायला हरकत नाही.परंतु आपली संस्कृती जोपासलीच पाहिजे व कोणतेही कार्य संस्कृतीलाच धरून असावे.कारण भारतीय संस्कृती ही संपूर्ण जगात आगळीवेगळी आहे. तीला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी आजच्या युवा पिढीने घेतली पाहिजे.भारतात अनेक जाती-धर्मांचे लोक रहातात.त्याचप्रमाणे या पावनभुमित अनेक भाषा, अनेक पंथ, अनेक जाती, अनेक धर्म, अनेक वेशभूषा व आगळीवेगळी संस्कृती आपल्याला पहायला मिळते. आपण देशातील कोणत्याही टोकावरून निघालो तर प्रत्येक ४० किलोमीटर अंतरा नंतर आपल्याला वेगवेगळ्या भाषेचा गोडवा पहायला मिळतो.अशा परीस्थितीत संस्कृतीची जोपासना आजच्या युगातील युगलांनी करायला पाहिजे.आज जगातील अनेक देश भारतीय संस्कृती अवगत करण्याच्या मार्गावर आहेत.त्याचप्रमाणे अनेक देशांतील नागरिक भारत भ्रमन करतांना दिसतात.भारतात ३६५ दिवसातील प्रत्येक दिवसाला आगळे वेगळे महत्व असते हे आपणा सर्वांनाच माहित आहे.योगाची सुरुवात भारतातुनच झाली आणि योगाला संपूर्ण जगाने स्वीकारले जगातील मुस्लिम राष्ट्र असो किंवा कोणतेही राष्ट्र असो योगाला जास्त महत्व देतात हीच जडणघडण भारतीय संस्कृतीमध्ये आहे याची जाण युवकांनी ठेवली पाहिजे.त्याचप्रमाणे आयुर्वेद शास्त्र भारतातुन विकसित झाले व हजारो पध्दतीची औषधी युक्त वृक्ष भारतात पहायला मिळते.परंतु आपली युवा पिढी पाश्चिमात्य संस्कृतीकडे वळतांना दीसते हे भारतीय देवभुमिचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की ज्या ठिकाणी सर्वच धर्मांचे लोक आनंदाने रहातात.सोबतच भारत हा ऋषी-मुनिंचा,सुफी-साधु-संत,महाज्ञानी, क्रांतीकारक, स्वतंत्रा सेनानी, थोरपुरूषांच्या अथक प्रयत्नाने सुसंस्कृत भारत देश मोठ्या डौलाने उभा आहे.याभुमित भगवान राम, गौतम बुद्ध, महंमद पैगंबर, गुरू गोविंदसिंग इत्यादीसह अनेक देवी-देवतांचे वास्तव्य या भारत भुमीत आपल्याला पहायला मिळते.त्यांच्याच पुण्यायीने भारतीय संस्कृती विकसित झाली आहे.भारतावर सर्वच धर्माच्या देवी-देवतांचा आशिर्वाद आहे.त्याचप्रमाणे हिंदू, मुस्लिम,शिख,ईसाई, बौद्ध, जैन इत्यादी धर्माचा मोठा पगडा भारतीय संस्कृतीवर आहे.त्यामुळेच आज भारतात एकोप्याचे व खेळीमेळीचे वातावरण दिसून येते.ऐवढी अफाट आणि शक्तीशाली भारतीय संस्कृती असतांना भारतीय युगलांनी व युवकांनी पाश्चिमात्य संस्कृतीचा किंवा पध्दतीचा अवलंब का करावा?८ हेलेंटाईन डे च्या माध्यमातून भारतीय संस्कृती धोक्यात येवु शकते याला नाकारता येत नाही.याचा विचार युवा पिढीतील युगलांनी करावा.व्हेलेंटाईन डे साजरा करतांना भारतीय संस्कृती नुसारच साजरा करावा.कारण कोणत्या ना कोणत्या मार्गाने पाश्चिमात्य पध्दती भारतात घर करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.याला रोखण्याची नितांत गरज आहे. अन्यथा भारतीय संस्कृतीचे वाटोळे झाल्याशिवाय राहणार नाही. हीबाब आजच्या नवीन पिढीने लक्षात ठेवली पाहिजे.पाश्चिमात्य संस्कृतीचा अभ्यास अवश्य करावा.परंतु त्याचा अवलंब करू नका ही माझी आग्रहाची व कळकळीची विनंती आहे.अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा भारत दौ-यावर असतांना त्यांनी भारतीय संस्कृतीची प्रशंसा केली होती.परंतु अमेरिकेत गेल्यावर ६ फेब्रुवारी २०१५ ला भारतीय संस्कृतीवर ताशेरे ओढताना ते म्हणतात की गेल्या काही वर्षांपासून भारतात असहिष्णुता वाढली आहे.याचाच अर्थ असा की बोलतांना सांगायचे की तुमची संस्कृती चांगली आहे आणि मायदेशी गेल्यावर दुसऱ्याच्या संस्कृतीला असहिष्णुता म्हणायचे व आपल्या पाश्चिमात्य पध्दतीचा प्रचार करायचा हा कुठला न्याय? मुख्य कारण म्हणजे त्यांना भारतात सर्व धर्मांचे,जातीचे, पंथाचे लोक एकोप्याने रहातात ही बाब रूतली असावी.त्यामुळे मित्रांनो पुन्हा सांगतो की भारतीय संस्कृतीलाच स्वीकारावे व पाश्चिमात्य पध्दतीला 'टाटा-बाय-बाय' करावे.कारण जगाच्या पाठीवर भारतीय संस्कृती 'अनभिज्ञ'आहे.भारतात रामायण, गीता, कुराण, बायबल, ग्रंथ या पाच भुजांनी बनलेला भारत व भारतीय संस्कृती आहे.त्यामुळे भारतीय संस्कृतीची जोपासना करणे हे प्रत्येक भारतीयांचे प्रथम कर्तव्य आहे.मी पुन्हा एकदा सांगुईच्छीतो की व्हेलेंटाईन डे या दिवसाला भारतीय संस्कृतीला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी युगलांनी घ्यावी.भारतीय संस्कृती इतकी अबाध्य आहे की अनेक वृक्ष, फुले व फळे संस्कृतीला धरून आहे.त्यामुळे जगाच्या दृष्टीकोनातून भारतीय निसर्ग सृष्टी आगळीवेगळी दीसुन येते.आज भारत आपल्या दुश्मन देशालासुध्दा मदत करीत आहे यामागचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती होय.आठवड्याचे ७ दिवस असतात.परंतु भारतीय संस्कृतीत प्रत्येक धर्मासाठी सातही दिवसाला वेगवेगळे महत्त्व दीसून येते.सुर्य,चंद्र,तारे संपूर्ण जग पहाते परंतु भारतात यांची वेगवेगळ्या पध्दतीने जोपासना करून प्रत्येक धर्माच्या माध्यमातून पुजा-अर्चना केली जाते.भारतीय संस्कृतीला देवी-देवतांनी भरपूर काही दिले जे जगात तुम्हाला कुठेही पहायला मिळनार नाही.आज भारतात हिवाळा, उन्हाळा आणि पावसाळा पहायला मिळतो यातुनच सप्तरंगी धनुष्य तयार होतो.वर्षाचे १२ महीने असतात त्यात आपल्याला आगळ-वेगळ रूप,रंग पहायला मिळते.त्यामुळे भारतीय संस्कृतीची बरोबरी कोणताही देश करू शकत नाही आणि करणार नाही.करिता भारतीय संस्कृतीची जोपासना केलीच पाहिजे व पाश्चिमात्य संस्कृतीचा त्याग केला पाहिजे असे मला वाटते.कारण भारतीय संस्कृती ही जगातील अजुब्यातील एक अजुबा आहे.आपण व्हेलेंटाईन डे साजरा करतांना भारतीय संस्कृती प्रमाणेच साजरा करावा.यामुळे प्रत्येकाच्या आयुष्यात नवीन ऊर्जा निर्माण होवून नवचैतन्य दिसून येईल. त्याचप्रमाणे या दिवसाला युगलांनी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्याचा संकल्प करावा.

**- रमेश कृष्णराव लांजेवार.**
(माजि विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)

# आज माघी वसंत पंचमी

**सर्व** ऋतूंचा राजा असणाऱ्या वसंत ऋतूच्या आगमनाची चाहूल वसंत पंचमीच्या दिनी लागते. तसेच हा दिवस देवी सरस्वती आणि लक्ष्मी यांचा जन्मदिवसही मानला जातो. वसंत पंचमी या उत्सवामागील इतिहास आणि त्याचे महत्त्व सनातन संस्थेच्या या लेखातून जाणून घेऊया.

**श्री सरस्वतीदेवी**

**१. तिथी -** वसंत पंचमी हा उत्सव 'माघ शुद्ध पंचमी' या तिथीला साजरा करतात.

**२. इतिहास आणि साजरी करण्याची पद्धत**

अ. कामदेव मदनाचा जन्म याच दिवशी झाला, असे म्हटले आहे. दांपत्यजीवन सुखाचे जावे, यासाठी लोक रतिमदनाची पूजा आणि प्रार्थना करत असत.

आ. वसंत पंचमी या दिवशी नवीन पिकांच्या लोंब्या आणून त्या घरातील देवतेला अर्पण करून नवान्न ग्रहण करतात.

इ. वसंत पंचमी या तिथीला सरस्वतीदेवी उत्पन्न झाली; म्हणून तिची पूजा करतात, तसेच लक्ष्मीचाही हा जन्मदिन मानला जातो; म्हणून या तिथीला 'श्रीपंचमी' असेही म्हणतात.

ई. या दिवशी पहाटे अभ्यंगस्नान करून पूजा करतात. वसंत पंचमी या दिवशी वाणीची अधिष्ठात्री देवी सरस्वती हिची पूजा आणि प्रार्थना करण्याचे महत्त्व आहे. हा दिवस देवीचा प्रकटदिन म्हणून मानला जातो. या दिवशी कलशाची स्थापना करून त्यात सरस्वतीदेवीला आवाहन करून तिचे पूजन केले जाते.

**३. वेद आणि पुराण यांमध्ये वर्णन केलेला सरस्वतीदेवीचा महिमा**

३ अ. सरस्वतीच्या श्वेतधवल रूपाचे वेदांत केलेले वर्णन

या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता
या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना ।
या ब्रह्माच्युत शङ्कर प्रभृतिभिर्देवैः सदा वन्दिता
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा ?

**अर्थ :** जी कुंदाचे फूल, चंद्र, हिमतुषार किंवा मोत्यांचा हार यांप्रमाणे गौरवर्णी आहे; जिने शुभ्र वस्त्र धारण केले आहे; जिचे हात उत्तम विणेमुळे शोभत आहेत; जी शुभ्र कमळांच्या आसनावर विराजमान झालेली आहे; ब्रह्मा, विष्णु, महेश इत्यादी देवता जिची निरंतर स्तुती करतात; जी सर्व प्रकारची जडता (अज्ञान) दूर करते, अशी ती भगवती, श्री सरस्वतीदेवी माझे रक्षण करो.

ऋग्वेदातील १०/१२५ या सूक्तात सरस्वतीदेवीचा असीम प्रभाव आणि महिमा यांचे वर्णन आहे. विद्या आणि ज्ञान यांची अधिष्ठात्री देवता सरस्वती हिचा ज्यांच्या जिभेवर वास असतो, ते अतिशय विद्वान अन् कुशाग्र बुद्धीचे असतात.

**३ आ. पुराणांतील सरस्वतीदेवीचे वर्णन :** रूपमंडनमध्ये वाग्देवीचे शांत, सौम्य आणि शास्त्रोक्त असे वर्णन आढळते. देवीच्या रूपांमध्ये दुधाप्रमाणे शुभ्र रंगाच्या सरस्वती देवीच्या रूपाला अधिक महत्त्वाचे मानण्यात आले आहे.

**३ आ. मत्स्यपुराणातील सरस्वतीदेवीचा महिमा :** सरस्वतीदेवीचे रूप आणि सौंदर्य यांविषयीचा एक प्रसंग मत्स्यपुराणातही आला आहे. ब्रह्मदेवाने जेव्हा या विश?वाची निर्मिती करण्याच्या इच्छेने आपल्या हृदयात सावित्रीचे ध्यान करून तप करण्यास प्रारंभ केला, त्या वेळी त्याचे निष्पाप शरीर २ भागांत विभक्त झाले. त्यांमध्ये अर्धा भाग स्त्रीचा आणि अर्धा भाग पुरुषाचा झाला. ती स्त्री सरस्वती आणि शतरूपा या नावांनी प्रसिद्ध झाली. तीच सावित्री, गायत्री आणि ब्रह्माणी म्हणून ओळखली जाते. अशा प्रकारे आपल्या शरिरातून निर्माण झालेल्या सावित्रीला पाहून ब्रह्मदेव मुग्ध होऊन म्हणाले, ''हे किती सौंदर्यवान रूप आहे ! हे किती मनोहर रूप आहे !!''

त्यानंतर सुंदरी सावित्रीने ब्रह्मदेवाला प्रदक्षिणा घातली. सावित्रीच्या रूपाचे अवलोकन करण्याची इच्छा झाल्यामुळे ब्रह्मदेवाच्या मुखाच्या मागील उजव्या बाजूला एक नवे मुख प्रकट झाले. पुन्हा विस्मययुक्त आणि फडफडणारे ओठ असलेले तिसरे मुखही मागील बाजूला प्रकट झाले आणि त्याच्या उजव्या बाजूला कामदेवाच्या बाणांनी व्यथित झालेल्या एका मुखाचा आविर्भाव झाला.

**३ इ. वाल्मीकि रामायणातील सरस्वतीदेवीविषयीची कथा :** 'सरस्वतीने आपल्या चातुर्याने देवांना राक्षसराज कुंभकर्णापासून कसे वाचवले ?', याची एक मनोरम कथा वाल्मीकि रामायणाच्या उत्तरकांडात आहे.

देवीचा वर मिळवण्यासाठी कुंभकर्णाने १० सहस्र वर्षे गोवर्णात घोर तपस्या केली. जेव्हा ब्रह्मदेव वर देण्यास सिद्ध झाले, तेव्हा देव त्यांना म्हणाले, ''कुंभकर्ण हा राक्षस आहे आणि तो आपण वर दिल्यामुळे अधिकच उन्मत्त होईल.'' तेव्हा ब्रह्मदेवाने सरस्वतीचे स्मरण केले. मग सरस्वती त्या राक्षसाच्या जिभेवर आरूढ झाली. सरस्वतीच्या प्रभावामुळे कुंभकर्ण ब्रह्मदेवाला म्हणाला,

स्वप्नं वर्षाण्यनेकानि देव देव ममेप्सितम् । – वाल्मीकिरामायण, कांड ७, सर्ग १०, श?लोक ४५

अर्थ : 'मी अनेक वर्षांपर्यंत झोपून रहावे', अशी माझी इच्छा आहे.

सरस्वती देवीची नामावली

विद्यार्थ्यांनी सरस्वती देवीची पुढील नामावली पाठ करावी.

प्रथमं भारती नाम द्वितीयं च सरस्वती ।
तृतीयं शारदादेवी चतुर्थं हंसवाहिनी ॥
पंचमं जगती ख्याता षष्ठं वागीश्वरी तथा ।
सप्तमं कुमुदी प्रोक्ता अष्टमं ब्रह्मचारिणी ॥
नवमं बुद्धिदात्री च दशमं वरदायिनी ।
एकादशं चन्द्रकान्तिर्द्वादशं भुवनेश्वरी ॥
द्वादशैतानि नामानि त्रिसन्ध्यं यः पठेन्नरः ।
जिह्वाग्रे वसते नित्यं ब्रह्मरूपा सरस्वती ॥ – ('ऋषीप्रसाद', फेब्रुवारी २००८)

**४. वसंतपंचमीचे महत्त्व**

**४ अ. महासरस्वतीचा जन्मदिन**

वसंत पर्वाचा आरंभ वसंतपंचमीने होतो. याच दिवशी श्री, म्हणजे विद्येची अधिष्ठात्री देवता महासरस्वती हिचा जन्मदिन साजरा करण्यात येतो.

**४ अ १. सरस्वतीचे पूजन आणि आराधना :** ब्राह्मणग्रंथांनुसार वाग्देवी सरस्वती ब्रह्मस्वरूपा, कामधेनु आणि समस्त देव यांची प्रतिनिधी आहे. तीच विद्या, बुद्धी आणि ज्ञान यांची देवी आहे. अमित तेजस्विनी आणि अनंत गुणशालिनी देवी सरस्वतीची पूजा अन् आराधना यांसाठी माघ मासातील (महिन्यातील) पंचमी ही तिथी निश्चित केली गेली आहे. वसंतपंचमीला तिचा आविर्भाव दिवस मानला जातो. त्यामुळे 'वागीश्वरी जयंती' आणि 'श्रीपंचमी' या नावानेही ही तिथी प्रसिद्ध आहे.

**४ अ २. सरस्वतीदेवीचे पूजन करण्याच्या पद्धती :** वसंतपंचमीचा हा दिवस सरस्वतीदेवीच्या साधनेसाठीच अर्पण केला जातो. शास्त्रांमध्ये भगवती सरस्वतीची आराधना वैयक्तिक स्वरूपात करण्याचे विधान आहे; परंतु सध्या सार्वजनिक पूजामंडपात देवी सरस्वतीची मूर्ती स्थापन करून तिची पूजा करण्याचा प्रघात चालू झाला आहे. हा ज्ञानाचा सण असल्यामुळे विद्यार्थी शिक्षण संस्थेची सजावट करतात. विद्यारंभ संस्कारासाठी हा सर्वोत्कृष्ट मुहूर्त आणि दिवस असतो.

**४ आ. नवीन कार्यासाठी शुभदिवस :** वसंतपंचमी हा सर्व प्रकारच्या शुभकार्यासाठी अत्यंत शुभमुहूर्त मानला गेला आहे. यांत प्रामुख्याने नवी विद्याप्राप्ती आणि गृहप्रवेश यांसाठी वसंतपंचमीला पुराणांतही अतिशय श्रेयस्कर मानले गेले आहे. वसंतपंचमीला शुभमुहूर्त मानण्यामागे अनेक कारणे आहेत. हे पर्व बहुतेक वेळा माघ मासातच येते. माघ मासाचे धार्मिक आणि आध्यात्मिक दृष्टीनेही विशेष महत्त्व आहे. या मासात 'पवित्र तीर्थक्षेत्री स्नान करणे', हे विशेष महत्त्वाचे मानले गेले आहे.

**४ इ. उत्तरायण :** या काळात सूर्यदेवाचे उत्तरायण असते. पुराणांमध्ये उल्लेख आढळतो, 'देवतांचे एक अहोरात्र (दिवस-रात्र) ही मनुष्याच्या एक वर्षाच्या समान असते. उत्तरायणाला देवतांचा दिवस आणि दक्षिणायनाला देवतांची रात्र मानले जाते. १४ जानेवारी या दिवशी सूर्य मकर राशीत प्रवेश करतो आणि पुढील ६ मास उत्तरायण असते.'

सूर्याचे मकर राशीतून मिथुन राशीपर्यंतचे भ्रमण उत्तरायण समजले जाते. देवतांचा दिवस माघ मासातील मकरसंक्रांतीपासून प्रारंभ होऊन तो आषाढ मासापर्यंत चालतो. त्यानंतर आषाढ मासातील शुक्ल पक्षातील एकादशीपासून कार्तिक मासातील शुक्ल पक्षातील एकादशीपर्यंतचा काळ हा विष्णूचा शयनकाळ मानला जातो. या काळात सूर्यदेव कर्क राशीतून धनु राशीपर्यंत भ्रमण करतो. याला सूर्याचा दक्षिणायन काळ असेही म्हणतात. सामान्यपणे या काळात शुभ कार्ये वर्ज्य मानली गेली आहेत.

**४ ई. ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीकोनातून :** ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीने सूर्याला ब्रह्मांडाचा आत्मा, पद, प्रतिष्ठा, भौतिक समृद्धी, औषधी, बुद्धी आणि ज्ञान यांचा कारक ग्रह मानला गेला आहे. याच प्रकारे पंचमीची तिथी कोणत्या ना कोणत्या देवतेला समर्पित केली गेली आहे. वसंतपंचमीला मुख्यत्वे सरस्वतीचे पूजनच महत्त्वाचे मानले गेले आहे. या ऋतूमध्ये निसर्गाला ईश्वरप्रदत्त वरदान म्हणून हिरवळ, रोपे आणि वृक्ष यांवर पल्लवित पुष्प अन् फळे यांच्या रूपात स्पष्टपणे पाहिले जाऊ शकतो.' (संदर्भ : संकेतस्थळ)

**५. वसंत पंचमी या उत्सवाचा उद्देश :** या दिवशी सृष्टीतील नवचैतन्य आणि नवनिर्माण यांच्यामुळे झालेला आनंद प्रकट करणे आणि मौज करणे, हा या उत्सवाचा उद्देश आहे.

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघुळदे, सनातन संस्था**

## जायंट्स ग्रुप ऑफ चिकलठाणाच्या अध्यक्षपदी राहुल मुथा, सचिव पदी गणेश इंदाणी आणि कोषाध्यक्षपदी संगीता बांठिया यांची निवड





छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) - गेल्या ३१ वर्षापासून समाजसेवेचे काय करणाऱ्या जायंट्स ग्रुप ऑफ चिकलठाणा ची सवसाधारण सभा नुकतीच संपन्नझाली. त्यात २०२४ साठी नवीन कायकारिणी सवसाधारण मतदानाने जाहीर करण्यात आलो. ज्यामध्ये अध्यक्षपदासाठी राहुल मुथा, सहयोगी सचिवपदासाठी गणेश इंदाणी आणि कोषाध्यक्षपदी संगीता बांठिया यांची निवड करण्यात आली. पवन सिपानी यांची अंतगत उपाध्यक्षपदी तर वैशाली कासलीवाल यांची बाह्य अध्यक्षपदी तर कल्पना मेहता यांची माजी अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. संचालक सदस्यांमध्ये अनिल संचेती, रतन कुंकुलोल, दिनेश मुथा, भारती कटारिया, पूनम गिल्डा आणि रोहिणी मालशेटवार यांची निवड करण्यात आलो. सल्लागार समितीमध्ये विनोद शेवतेकर, शिवप्रसाद तोतला, नरेश गुप्ता यांचा समावेश आहे.

## कतारमधून ८ भारतीयांची सुटका, मोदी-डोवाल यांनी सांभाळला मोर्चा

नवी दिल्ली, दि. १३ (वृत्तसंस्था)- कतारमध्ये ताब्यात घेतलेल्या भारताच्या ८ माजी नौदल अधिकाऱ्यांची अखेर सुटका करण्यात आली आहे. यातील ७ जण मायदेशातही परतले आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने याबाबत विधान केले त्यात म्हटले की आठ भारतीय नागरिकांच्या सुटकेचे स्वागत केले जातो. कतारमध्ये या अधिकाऱ्यांना ऑगस्ट २०२२मध्ये ताब्यात घेण्यात आले होते. गेल्यावर्षी कतारच्या न्यायलयाने त्यांना हेरगिरीच्या आरोपात दोषी ठरवताना फाशीची शिक्षा सुनावली होती. दरम्यान,यानंतर त्यांची शिक्षा कमी करण्यात आली होती. १४ फेब्रुवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी कतारची राजधानी दोहा येथे जात आहे. त्याआधीच भारतीयांची सुटका करण्यात आली आहे. पंतप्रधान मोदी यूएई दौऱ्यानंतर कतारला पोहोचतील.

## राज्यात निसर्ग मित्र गिधाड उरली फक्त २००; यांची घटती संख्या चिंताजनक

**राज्यात** एका सर्वेक्षणात लक्षात आले की गिधाडांची संख्या फक्त २०० इतकीच रहाली आहे. ही बाब राज्यासाठी व संपूर्ण जीवसृष्टीसाठी अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. राज्यात शुभ्र पांढरे, लांब आणि बारीक चोचीचे गिधाड आढळतात. गडचिरोली जिल्ह्यात यांची संख्या सर्वाधिक आहे. या खालोखाल नाशिक, पेंच, चंद्रपूर, रोहा, कोल्हापूर आणि कोकणातही गिधाडांची नोंद आढळते. या पध्दतीने राज्यातील गिधाडांचा विचार केला तर अत्यल्प असुन २०० वर येवून ठेपल्याचे सांगितले जाते. तीन वर्षांपूर्वी ही संख्या २५० इतकी होती असे सांगितले जाते. परंतु ही संख्या कमी होत असल्याने चिंता वाढली आहे. निसर्गाची जीवनसाखळी एकमेकांवर अवलंबून असते. या साखळीत गिधाडांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. गुजरात, हरियाणा, उत्तराखंड,व हिमाचल प्रदेश हे यांच्या अस्तित्वाचे मुख्य प्रदेश आहेत. गुरांना देण्यात येणाऱ्या डायक्लोफिनॅक औषधामुळे गिधाडांचा सर्वात जास्त मृत्यू होत आहे.यासोबतच मलेरियामुळे राज्यात गिधाडांचे मृत्यू झाल्याचे 'एनएडब्ल्यूएआर' चे संशोधन सांगतो. राज्याप्रमाणे देशाचा विचार केला तर देशात दिवसेंदिवस सर्वच स्तरातून प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अत्याधुनिक साधनसामग्री, कारखाने, जंगल तोड, वाढते औद्योगिकीकरण यांमुळे आकाश -पाताळ -पृथ्वी-निसर्ग-समुद्र पुर्णपणे अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये येवुन ठेपला आहे.यामुळे सर्वत्र मोठ्या प्रमाणात प्रदुषण दिसून येते. मृत जनावरांचे मांस खाऊन निसर्गाचे संतुलन सुरक्षित ठेवण्याचे काम मुख्यत्वेकरून गिधाडांचे आहे.त्यामुळे गिधाड आपली भूमिका चोखपणे बजावुन निसर्ग निरोगी ठेवुन पृथ्वीचे रक्षण गिधाड करायचे व करीत आहे.त्यामुळे त्यांना निसर्गातील स्वच्छता दुत सुध्दा म्हणतात.परंतु राज्यासह देशासाठी धक्कादायक बातमी म्हणजे भारतातील ९० टक्के गिधाडांची संख्या घटल्याने भारतीय निसर्गावर मोठे संकट आल्याचे दिसून येते.यासाठी आजच्या परिस्थितीत गिधाडांना वाचवीने काळाची गरज आहे. याकरीता पर्यावरणाचा मुख्य घटक म्हणून गिधाडांची ओळख आहे. परंतु त्यांची घटती संख्या पाहता त्यांचे संवर्धन होवून संख्या वाढविण्याच्या दृष्टीकोनातुन दरवर्षी सप्टेंबर महिन्यातील पहिला शनिवार आंतरराष्ट्रीय गिधाड संवर्धन दिन म्हणून पाळला जातो.गिधाडांना मृत्यूच्या खाईत लोटण्याचे काम बुद्धिजीवी मानवजातीनेच केले आहे. भारतात ६ भारतीय व ३ स्थलांतरित अशा ९ प्रजातीच्या गिधाडांचे अस्तित्व आहे. १९८० च्या दशकापर्यंत देशात गिधाडांची संख्या ४० दशलक्ष पेक्षा जास्त होती. मात्र डायक्लोफेनॅक सारख्या विषारी औषधांमुळे अवघ्या १५-२० वर्षात ९० टक्के गिधाडे संपली. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत भारतात १९ हजार तर महाराष्ट्रात फक्त २०० गिधाड असल्याचे सांगितले जाते. काही प्रजाती तर नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे मृत जनावरांचे मांस खाऊन निसर्गाचे संतुलन निरोगी ठेवणाऱ्या या निसर्ग मित्रालाच आता वाचविण्याची वेळ आली आहे. २५-३० वर्षापुर्वी गिधाड मृत जनावरांचे जे मांस खायचे ते त्यांना पोषक व आहार युक्त होते. परंतु आधुनिक युगात गेल्या काही वर्षांपासून जनावरांना अनेक रोगांपासून वाचविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची औषधे व इंजेक्शन देऊन त्यांचे प्राण वाचवले जाते. काही जनावरांना प्रजननासाठी व दुधाची मात्रा वाढवीण्यासाठी मोठ्या प्रमाणात औषधांचा व इंजेक्शनचा वापर होतांना दिसतो व होत आहे.परंतु यांचा विपरीत परिणाम निसर्ग संरक्षक गिधाड याला भोगावा लागत आहे. कारण जी औषधे जनावरांना देण्यात येते ती औषधे जनावरे मृतपावल्यानंतर संपूर्ण जनावरे विषेली होतात.

ही मृत जनावरे गिधाड खातात व त्यांना अनेक रोगांच्या यातना भोगुन मृत्यूशी झुंज द्यावी लागते.यामुळेच आज निसर्ग मित्र गिधाड यांची संख्या ९० टक्याने घटल्याचे दिसून येते.ही अत्यंत चिंतेची आणि गंभीर बाब आहे. एका माहितीनुसार १९९३ ते २००७ दरम्यान भारतीय प्रजाती असलेल्या पांढ्या पुठ्याचे गिधाडांची संख्या ९९.९ टक्के नष्ट झाली आहे.याशिवाय भारतीय गिधाड व निमुळत्या चोचीचे गिधाड या प्रजातींची ९९ टक्के संख्या कमी झाली आहे. म्हणजेच निसर्ग सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने गिधाडांची संख्या कमी होने अत्यंत चिंताजनक बाब आहे.त्यामुळे गिधाडांच्या बहुतेक प्रजाती नामशेष होण्याची भीती पहाता; भारतीय निसर्ग मित्राला वाचविण्याची काळाची गरज आहे. २०२० ते २०२५ पर्यंतच्या भारतातील गिधाड संवर्धनाच्या कृती आराखड्यानुसार भारतीय गिधाड फाउंडेशनच्या सहकार्याने महाराष्ट्र वनविभाग गिधाड संवर्धन प्रजनन केंद्रे स्थापन करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. त्याचप्रमाणे ताडोबा -अंधारी व्याघ्रप्रकल्प व बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने जटायू संवर्धन केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे पिंजोरा (हरियाणा) येथील गिधाड प्रजनन व संशोधन केंद्राने गिधाडांची संख्या वाढविण्यावर भर देत आहेत.ही अत्यंत आनंदाची बाब आहे याचे स्वागतच. देशातील गिधाडांची घटती संख्या पाहता राज्य सरकार व केंद्र शासीत प्रदेशातील वनविभागाने गिधाडांना वाचवीन्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे.

आज आपण पहातो गिधाडच काय तर घार सारखे महाकाय पक्षी सुध्दा डोळयांनी दिसत नाही.अशाप्रकारे असे अनेक पशुपक्षी आहे ते लुप्त झाले आहेत किंवा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. निसर्गाचे संतुलन बिघडल्याने पशुपक्षीच काय तर अनेक औषधी युक्त वनस्पती नामशेष झाली आहे किंवा नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे बुद्धिजीवी मानवाने लक्षात ठेवले पाहिजे की या पृथ्वीतलावरील प्रत्येक वस्तू, जीवजंतू, पशुपक्षी व वनस्पती या सर्वच एकमेकांशी निगडित आहे. त्यामुळे आज निसर्गमित्र गिधाडांचे संवर्धन करणे गरजेचे आहे सोबतच निसर्ग वाचविने तेवढेच आवश्यक आहे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल व सोबतच प्रदूषणावर सुध्दा मात करण्यास आपल्याला यश प्राप्त होईल.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)

## विनामानधन कीर्तन, ज्ञानदास डॉ. फड यांचा भाविकांनी केला सन्मान



जालना, दि. १३ (प्रतिनिधी) - कसल्याही प्रकारचे मानधन न घेता कीर्तन केल्याने व मानधन दिले असता ते घेण्यास नकार दिल्याने आणि मी येथेच नाही तर कोठेही धार्मिक सप्ताहातील कीर्तनाचे मानधन घेत नाही हे कीर्तनातून स्पष्ट सांगीतल्याने संयोजक व भाविकांनी ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांचा धार्मिक ग्रंथ देऊन स्नमान करुन आनंद व्यक्त केला.

चौधरीनगर येथे दरवर्षीप्रमाणे कीर्तन उत्सव सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशीचे काल्याचे कीर्तन सेवेचे पुष्प गुंफतांना डॉ. फड यांनी तुकाराम महाराजांच्या, गोकुळीच्या सुखा । अंतपार नाही लेखा ?, या अभंगावर कीर्तन केले. फड यांनी आई वडिलांचे खरे हित त्यांची मुलं चांगली निर्माण होण्यात असते असे सांगीतले. मुलं ही केवळ मोठ्या महाविद्यालयात गेल्याने किंवा चार-दोन खासगी शिकवण्या लावल्याने चांगली निर्माण होत नाहीत, तर त्यांचेवर घरात होणारे संस्कार महत्त्वाचे असतात. त्यामुळे आईवडीलांनी त्यांच्या आईवडीलांशी, बहिण भावंडांशी, शेजाऱ्या पाजाऱ्यांशी चांगले वागले पाहिजे. चांगले वागण्यासाठी पैसा खर्च करावा लागत नाही तर फक्त ईर्षा, व्देष, मत्सर, अहंकार, काम, क्रोध, या मानवतेच्या शत्रूंचा त्याग करावा लागतो, असे ते म्हणाले. फड यांनी समाजातील अनेक अनिष्ट प्रथावर विविध अभंग, श्लोक, ओव्यांच्या आधारे मत मांडले. पुढे बोलतांना ते म्हणाले की, कर्तव्य हाच भक्तीचा व मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहे. म्हणून श्रीमद्भगवत गीता आणि श्री ज्ञानेश्वरीत कर्तव्यावरच भर देण्यात आला आहे. वाट्याला आलेले कर्तव्य सोडून कोणी कितीही भक्ती केली तरी खऱ्या अर्थाने त्याच्या पदरी काही पडत नाही. म्हणून कर्तव्यात कसूर होणार नाही याकडे लक्ष दयावे असे म्हटले. अंतर्बाह्य स्वच्छता, वृक्षारोपण, स्त्रीयांचा मान सन्मान, वडीलधाऱ्यांची सेवा, गरजूंना मदत अशा बाबींवर त्यांनी भर दिला. मुलांना अभ्यासाच्या दृष्टीकोणातून मार्गदर्शन केले. सकाळी १० ते १२.३० या अडीच तासाच्या कीर्तनातून भाविकांना त्यांनी स्वत:चा शोध घेण्यास भाग पाडले. लोक कसेही वागोत आपण चांगलेच वागले पाहिजे अशी उपस्थितांनी त्यांची मानसिकता करून घेतल्याचे कीर्तनाअंती जाणवत होते. फड यांच्या कीर्तनाला मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी हनुमान महाराज वाघ, तुळजेच चौधरी, फुंजाराम पैठणकर, लक्ष्मण जाधव, यांनी पुढाकार घेतला होता. कीर्तनानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला.

## गायिका, अभिनेत्री मल्लिका राजपूतची आत्महत्या!

सुलतानपूर, दि. १३ (वृत्तसंस्था) - प्रसिद्ध गायिका आणि अभिनेत्री विजयालक्ष्मी उर्फ मल्लिका राजपूत हिच्या मृत्यूने



चाहत्यांना धक्का बसला आहे. मल्लिकाने तिच्या सुलतानपूर येथील घरात आत्महत्या केली, असे म्हटले जात आहे. परंतू मल्लिकाच्या मृत्यूचे कारण अजून अस्पष्ट आहे.

पोलिसांनी मल्लिकाचा मृतदेह ताब्यात घेऊन पोस्टमार्टमसाठी पाठवला आहे. सध्या पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा कसून तपास करत आहेत.

मल्लिकाची आई सुमित्रा सिंह यांनी सांगितले की, विजयालक्ष्मी सिंह उर्फ मल्लिका राजपूत ही नेहमीप्रमाणे रात्री खोलीत गेली आणि दरवाजा आतून बंद केला. दरवाजा बंद होता पण रुममधील लाईट सुरु होती. आम्ही तीन जणं तिथे होतो पण आम्हाला दरवाजा उघडता आला नाही. शेवटी मी खिडकीतून पाहिले तर तेव्हा माझी मुलगी मला लटकलेली दिसली. मी माझ्या नवऱ्याला आणि इतर काही लोकांना सांगितले. पण तोपर्यंत मल्लिका आम्हाला सोडून गेली.' मल्लिका राजपूतने अभिनेत्री कंगना राणौतसोबतही काम केले आहे. कंगनाच्या रिव्हॉल्वर रानी या चित्रपटात मल्लिकाने सहाय्यक भूमिकेत काम केले. गायक शानच्या यारा तुझे या म्युझिक अल्बममधून मल्लिकाला विशेष लोकप्रियता मिळाली. याशिवाय मल्लिकाने अनेक मालिका, अल्बम आणि मालिकांमध्येही काम केले आहे. मल्लिका राजपूतने भाजपामध्ये प्रवेश केला होता. पण २०१८ मध्ये तिने राजकारणाला रामराम ठोकला होता.

## मिथुन चक्रवर्ती यांच्या तब्येतीत सुधारणा, हॉस्पिटलमधून झाले डिस्चार्ज

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - मिथुन चक्रवर्ती यांना ब्रेन स्ट्रोक आला होता. यानंतर त्यांना एमर्जन्सी वॉर्डमध्ये ॲडमिट करण्यात आले होते. आता अभिनेत्यांच्या तब्येतीत सुधारणा आहे आणि त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. हॉस्पिटलमधून डिस्चार्ज मिळाल्यानंतर अभिनेत्यांना पंतप्रधान मोदींनी फोन केला आणि त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली.

अभिनेते मिथुन यांना सोमवारी दुपारी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. यानंतर या अभिनेत्यांनी स्वत: कन्फर्म केले की ते आता ठीक आहेत आणि लवकरच काम सुरू करतील. खरंतर आता काहीच त्रास नाही. मी पूर्णपणे ठीक आहे. मला माझ्या खाण्यापिण्यावर कंट्रोल करावा लागेल. मी लवकरच काम सुरू करेन. कदाचित उद्यापासून असे मिथुन म्हणाले.

## माता रमाई यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून महिलांनी काम करावे

### - प्रा.डॉ. रेखा मेश्राम यांचे प्रतिपादन

छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) - माता रमाईने अतिशय प्रतिकूल परिस्थितीत कुटुंबाचा सांभाळ करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षणासाठी मदत केली. रमाईच्या खंबीर साथीमुळेच बाबासाहेबांना उत्तुंग असे कार्य करता आले. रमाईचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून महिलांनी काम करावे, असे आवाहन रमाई मासिकाच्या संपादक प्रा. डॉ. रेखा मेश्राम यांनी केले.

मॉडर्न कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी आणि विक्रमशिला कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन यांच्या संयुक्त विद्यमाने माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त काही कृतिशील महिलांचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. उद्घाटन वस्तू व सेवा कर विभागाच्या राज्य कर उपायुक्त रंजना देशमुख यांच्या हस्ते झाले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. चित्ररेखा अशोक सिरसे यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून एपीआय अरुणा घुले, विक्रीकर निरीक्षक मनिषा बालखंडे, अनंत बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्ष पंचशीला सुधाकर बनाटे, तुलशी महिला मंडळ, बीडच्या अध्यक्ष दिपा प्रदीप रोडे, जोशाबा प्रतिष्ठाणच्या उपाध्यक्ष प्रियंका रविंद्र जोगदंड यांची उपस्थिती होती. यावेळी प्रा. रेखा मेश्राम यांनी रमाईच्या जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. अत्यंत हालाखीची परिस्थिती असतानाही रमाईने कष्टाने कुटुंबाचा सांभाळ केला. येणाऱ्या अडचणीची कल्पना बाबासाहेबांना होऊ दिली नाही. त्यांच्याच त्यागामुळे बाबासाहेबांचे कार्य पुढे गेले. सामाजिक कार्यामध्ये रमाईचा तेवढाच वाटा राहिलेला आहे. सर्वच महिलांवर रमाईचे मोठे उपकार आहेत. त्यांच्या कार्याचा वसा महिलांनी घेऊन विविध क्षेत्रात काम करावे, असे आवाहन डॉ. मेश्राम यांनी केले. अध्यक्षीय समारोपात सामाजिक कार्यकर्त्या डॉ. चित्ररेखा सिरसे यांनी सांगितले की, माता रमाईचे जीवन महिलांना प्रेरणा देणारे आहे. समाजासाठी काम करणाऱ्या महिलांचेच नाव इतिहासात नोंदविले गेले आहे. त्यामुळे महिलांनी पतीच्या सामाजिक कार्यात साथी द्यावी, तसेच महिलांनी स्वत:ही सामाजिक कार्यात भाग घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी प्रमुख पाहुण्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात करुणाताई तारु, अनिताताई हिवाळे, दैवशाला गवांदे, डॉ. शिल्पाराणी डोंगरे, सुनिता बनकर या महिलांचा आणि त्यांच्या कार्याचा गौरव करून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला प्रा. प्रदीप रोडे, वस्तू सेवा कर विभागाचे उपायुक्त रविंद्र जोगदंड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अशोक सिरसे, माजी शिक्षण संचालक सुधाकर बनाटे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य अर्चना साळवे यांनी केले. सूत्र संचलन स्वाती इबलकर यांनी केले आणि आभार ज्योती मोरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगिराज वाघमारे, संतोष प्रधान यांच्यासह मॉडर्न कॉलेज आणि विक्रमशिला महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



## लातूरच्या 'विभागस्तरीय नमो महारोजगार मेळाव्या'च्या यशस्वीतेसाठी समन्वयाने काम करा -महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) - कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांमार्फत बेरोजगार युवक तसेच नवउद्योजकांच्या कल्पनांना चालना देण्यासाठी आणि नोकरीइच्छुक उमेदवारांना रोजगार मिळावा यासाठी आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय नमो महारोजगार मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिल्या.



लातूर येथे मराठवाडा विभागांतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या महारोजगार मेळाव्याच्या पुर्वतयारीचा छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयातील बैठकीत महसूलमंत्री श्री. विखे-पाटील यांनी आज आढावा घेतला. यावेळी माजी मंत्री तथा आमदार संभाजी पाटील निलंगेकर, विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड, जिल्हाधिकारी जी. श्रीकांत, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, उपायुक्त जगदीश मिनीयार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.तसेच मराठवाडयातील सर्व जिल्हयांचे जिल्हाधिकारी व विविध विभागांचे अधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीव्दारे बैठकीत सहभागी झाले होते.

श्री. विखे पाटील म्हणाले, लातूर, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, नांदेड, हिंगोली, परभणी, जालना व बीड जिल्ह्यातील नोकरी इच्छुक युवक व युवतींसाठी 'विभागस्तरीय 'नमो महारोजगार मेळाव्याचे' २४ फेब्रुवारी रोजी लातूर येथे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात स्टार्टअप एक्सपोमध्ये विविध औद्योगिक शासकीय व खाजगी संस्था सहभागी होणार आहेत. या मेळाव्यात नोकरी इच्छुक युवक-युवती यांनी मुलाखतीसाठी आणि महाएक्सपो मध्ये स्टार्टअप्स, इनव्हेस्टर्स व इन्क्यूबेटर्स या सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

महारोजगार मेळाव्यासाठी स्टार्टअप व विविध उद्योगांचा सहभाग आवश्यक असून उद्योगांसाठी किती व कोणत्या स्वरूपाचे मनुष्यबळ गरजेचे आहे, याची माहिती संकलित करून त्यानुसार क्षेत्रनिहाय उमेदवारांची विभागणी केली तर सुलभता येईल. मेळाव्यासाठी जास्तीत जास्त उमेदवारांनी आणि औद्योगिक संस्थांनी नावनोंदणी करावी यासाठी जास्तीत जास्त उद्योजक आणि विविध शासकीय यंत्रणांनी प्रयत्न करावेत. नमो महारोजगार मेळाव्यात नोकरीइच्छुक उमेदवार यांचा सहभाग वाढावा यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे,असेही श्री विखे पाटील म्हणाले.

महारोजगार मेळाव्यास येणाऱ्या उमेदवारास रोजगाराबाबत मार्गदर्शन, प्रशिक्षण, कौशल्य विकासातील संधी याबाबत माहिती दिली जाणार आहे. मराठवाडयातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्हयातील रोजगारासाठी नोंदणी केलेल्या उमेदवारांची क्षेत्रनिहाय रोजगार संधी याबाबत नियोजन करावे. तसेच येणाऱ्या युवक-युवती यांच्यासाठी समन्वय अधिकारी नेमावा, असे निर्देशही त्यांनी दिले. माजी मंत्री संभाजी पाटील निलंगेकर यांनी महारोजगार मेळाव्याच्या नियोजनाबाबत महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. लातूरच्या जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांनी महारोजगार मेळाव्याच्या तयारीबाबत माहिती दिली. राज्यस्तरीय नमो महारोजगार मेळाव्यामध्ये दहावी, बारावी, आय.टी.आय., पदविका, पदवीधर, पदव्युत्तर, पदवी प्राप्त उमेदवारांच्या तेथेच मुलाखती घेत रोजगाराच्या संधी दिल्या जाणार आहेत. या मेळाव्यात नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. रोजगार मेळाव्यात सहभागी होणा-या उमेदवारांनी मेळाव्याच्या अगोदर ही नोंदणी करणे आवश्यक आहे.जे उमेदवार मेळाव्याच्या अगोदर नाव नोंदणी करतील, त्याच उमेदवारांच्या मेळाव्याच्या दिवशी मुलाखती होणार आहेत.नोंदणीसाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# ग्रंथोत्सवास उत्साहात प्रारंभ; ग्रंथ आहेत जीवनाची प्रेरक शक्ती -ऋषिकेश कांबळे



छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- मानवी जीवनाच्या प्रवासाच्या उद्गहनाचे विवेचन ग्रंथांमध्ये केले जाते. या जीवनाच्या परिक्रमेचा वेध घेण्यासाठी ग्रंथाशिवाय उपाय नाही. ग्रंथ हेच जीवनाची प्रेरक शक्ती आहे,असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक ऋषिकेश कांबळे यांनी आज येथे केले.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, यांच्या विद्यमाने समता दर्शन वाचनालय सभागृह, समता नगर येथे 'छत्रपती संभाजीनगर ग्रंथोत्सव २०२३' चे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाचे आज उत्साहात उद्घाटन झाले.

प्रारंभी सकाळी क्रांती चौकातून ग्रंथदिंडी काढण्यात आली. तेथे राज्याचे गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते ग्रंथपूजन करण्यात आले. तसेच श्री. सावे यांनी ग्रंथोत्सवास शुभेच्छा दिल्या. ग्रंथदिंडीत त्यात विद्यार्थी व साहित्यप्रेमी नागरिकांनी सहभाग घेतला. ग्रंथ दालनाचे उद्घाटनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे, सहाय्यक संचालक ग्रंथालय सुनील हुसे, माहिती अधिकारी डॉ. मीरा ढास, ग्रंथालय संघाचे कार्यवाह गुलाबराव मगर, कैलास पब्लिकेशनचे कैलास आतकरे, राजशेखर बालेकर, समता दर्शन संस्थेच्या अध्यक्ष वर्षा वासाडीकर यांच्यासह विद्यार्थी, नागरिक आणि ग्रंथ प्रेमींची उपस्थिती होती.

ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक ऋषिकेश कांबळे की, मनाची जोपासना ग्रंथ करत असतात. ग्रंथ वाचनातून भावनांची प्रेरक शक्ती प्राप्त होत असते. जीवनाचे संकल्प करण्याचे आणि ते प्रत्यक्ष आणण्याचे सामर्थ्य ग्रंथामधून व्यक्तीला मिळत असते. जीवन विकासाच्या प्रक्रिया समजून घेण्यासाठी ग्रंथाशिवाय उपाय नाही. उत्क्रांतीची प्रक्रियात श्रद्धा,प्रेम, आदरद्वेष, करुणा अशा विविध भावनांची ग्रंथाच्या वाचनातून माणसाला प्रचिती येते. संत वाड.मयाने परोपकाराची, समतेची भावना आपल्या साहित्यातून वाढीस लावली व माणूस म्हणून जगण्याची भावना केंद्रस्थानी ठेवून समतेचा संदेश दिल. ग्रंथ वाचनातून सर्व भावनांचे प्रगटीकरण होत. अनुभवसिद्धता मानवाला वाचनातून येत असते. अभिव्यक्तीसाठी ग्रंथाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे,असे त्यांनी यावेळी सांगितले.

दुसरा दिवस सकाळी ११ वा. मंथन विषय 'वाचन संस्कृती संवर्धानात माझा खारीचा वाटा', अध्यक्ष डॉ. दादा गोरे, सहभाग दै.सकाळ चे मराठवाडा आवृत्ती संपादक संतोष शालीग्राम, लेखाधिकारी शरद भिंगारे, साहित्यिक डॉ. ललित अधाने, साईबाबा वाचनालयाचे सचिव दुष्यंत आठवले, प्रकाशक भास्कर सरोदे.दुपारी २ वा. परिसंवाद विषय : सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासासाठी विविध योजना, दुपारी ४ वा.समारोप होईल. अध्यक्षस्थानी माजी कुलगुरु डॉ. सुधीर गव्हाणे, डॉ. धर्मराज वीर, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनिल हुसे, मसापचे कोषाध्यक्ष कुंडलिक अतकरे यांची उपस्थिती असेल.

ग्रंथोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे, समन्वय समिती सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनिल हुसे, शिक्षणाधिकारी (माध्य) एम.के.देशमुख, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, कार्यवाह मसाप डॉ. दादा गोरे, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष सुभाष सोळंके आदींनी केले आहे.

# लोकांचे जीवनमान उंचावणाऱ्या योजना प्रभावीपणे राबवा-डॉ. भागवत कराड



छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- ज्या योजनांचा लाभ दिल्याने लोकांचे विशेषतः दारिद्र्य रेषेखालील लोकांचे जीवनमान उंचावते अशा योजना प्रभावीपणे राबवून लोकांना दारिद्र्य रेषेच्या वर आणले पाहिजे,असे प्रतिपादन केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी आज केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आज डॉ. कराड यांनी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा आढावा घेतला. प्रभारी जिल्हाधिकारी जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे तसेच सर्व विभागप्रमुख बैठकीस उपस्थित होते.

बैठकीत केंद्राच्या विविध योजना तसेच राज्य शासनाच्या योजनांचा आढावा घेण्यात आला. महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी बचतगटांना द्यावयाचा अर्थपुरवठा, चांगले काम करणाऱ्या गटांना कर्ज उपलब्ध करुन देणे, शहरी व ग्रामिण भागातील बचत गटांच्या सद्यस्थितीबाबत आढावा घेण्यात आला. तसेच उज्ज्वला गॅस योजना, आयुष्मान भारत कार्ड योजना, रेशन कार्ड व त्यामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध योजनांचा लाभ याबाबतही डॉ. कराड यांनी आढावा घेतला. ते म्हणाले की, आयुष्मान कार्ड ही योजना म्हणजे आरोग्याची काळजी घेणारी योजना असून लोकांना आरोग्यावर होणारा आकस्मिक खर्चाचा भार कमी करणारी ही योजना आहे. तसेच प्रधानमंत्री स्वनिधी योजना अशा योजना ह्या गरिबांना अर्थ सहाय्य करणाऱ्या योजना असून त्यातून रोजगाराला प्राधान्य देण्यात आले आहे. प्रत्येक योजनेसाठी लाभ घेतांना आधार कार्ड संलग्नता असणे आवश्यक असून त्यासाठी सर्व संबंधितांनी प्रयत्न करावे,सए निर्देश डॉ. कराड यांनी दिले.

# रस्त्यावरील अतिक्रमणे हटविली; झोन क्रं एक मध्ये अतिक्रमण विभागाची कारवाई



छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- महानगरपालिका अतिक्रमण हटाव विभाग मार्फत आज टाऊन हॉल जुबली पार्क मिल कॉर्नर व भडकल गेट या परिसरातील रस्त्यावरचे सर्व प्रकारचे अतिक्रमणे हटविण्यात आली . यामध्ये दोन टपऱ्या व रस्त्यावर उभी असलेली दोन वाहने काढण्यात आली.

पुढे जुबली पार्क भडकल गेट येथे वाहने विक्री व्यवसाय करणारे व्यापाऱ्यांनी रस्त्यावर आपली वाहने उभी करून होता व वाहन विक्री व्यवसाय सुरू केला होता. त्यांना यापूर्वी सूचना दिल्या होत्या तरी देखील त्यांनी अतिक्रमण काढले नाही म्हणून आज हे सर्व गाड्या त्यांच्यासमोर काढण्यात आल्या. मिल कॉर्नर येथील बस स्टॉप जवळील फळ विक्रेते यांचे अतिक्रमणे हटवून याच रस्त्यावर पुढे बारा पूला गेटपर्यंत डावी आणि उजवी बाजू ला असलेल्या सर्व टपऱ्या काढून रस्ता मोकळा करण्यात आला.

बारा पूला गेट येथे एका व्यक्तीने मनपाच्या फुटपाथवर दहा बाय दहा या आकाराच्या जागेत पत्र्याचे शेड करून नान रोटी विक्री सुरू केले होते. सदर शेड निष्कर्षित करून साहित्य जमा करून रस्ता पूर्णपणे मोकळा करण्यात आला आहे.

सदर कारवाई आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी यांच्या व उप आयुक्त मंगेश देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त संजय सुरडकर,अतिक्रमण निरीक्षक सय्यद जमशेद,अतिक्रमण हटाव विभागाचे कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## तिसगावच्या शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील ९६ विद्यार्थ्यांना विषबाधा

खुलताबाद दि.१३ (प्रतिनिधी)- तालुक्यातील तिसगाव येथील आदिवासी आश्रम शाळेमध्ये ९६ विद्यार्थ्यांना आज सकाळी दुधातून विषबाधा झाल्याचे उघडकीस आले आहे. सर्व विद्यार्थ्यांना वैद्यकीय उपचारासाठी तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्र वेरूळ आणि ग्रामीण रुग्णालय खुलताबाद येथे दाखल करण्यात आले. याबाबत अधिक माहिती अशी की, मौजे तिसगाव येथील निवासी आदिवासी आश्रम शाळा आहे. आज सकाळी आठ वाजता विद्यार्थ्यांना दूध देण्यात आले होते. हे दूध पिताच विद्यार्थ्यांना मळमळ उलट्या जुलाब यासारख्या त्रास जाणवू लागला. काही विद्यार्थ्यांची तब्येत बिघडली होती. शाळा प्रशासनाने तातडीने ९६ विद्यार्थ्यांना ग्रामीण रुग्णालय खुलताबाद आणि प्राथमिक आरोग्य केंद्र वेरूळ येथे वैद्यकीय उपचारासाठी दाखल केले. सध्या विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर आहे.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास देहदान प्राप्त

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास देवराव भिकाजी गोजे यांच्या निधनानंतर त्यांच्या नातेवाईकांनी त्यांच्या देहदानाच्या इच्छेनुसार देह शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे शुक्रवारी (दि.९) रोजी सुपूर्द केलेअसे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता दोए. शिवाजी सुक्रे यांनी कळविले आहे.

देवराव भिकाजी गोजे (वय ७८) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले,त्यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र राजेंद्र देवराव गोजे आणि विजय देवराव गोजे यांनी त्यांचा मृतदेह या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील शरीररचनाशास्त्र विभागास शुक्रवारी (दि.९) दान केला. एम.बी.बी.एस. तसेच बी.डी.एस. चे विद्यार्थी तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि संशोधनपर कार्यासाठी या मृतदेहाचा उपयोग होणार आहे.

दिवंगत देवराव गोजे यांच्या कुटुंबियाकडून मृतदेह प्राप्त झाल्याबद्दल अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी त्यांना प्रमाणपत्र दिले.

दिवंगत देवराव गोजे यांच्या मुलांनी त्यांच्या वडिलांचे देहदान केले. त्यांच्या या कार्यामुळे समाजामध्ये देहदान करण्याविषयी जनजागृती होण्यास व वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यास मोलाची मदत होणार आहे.

शरीररचनाशास्त्र विभागाच्या प्राध्यापक डॉ.अर्चना कल्याणकार यांनी गोजे परिवाराचे आभार व्यक्त केले. शरीररचनाशास्त्र विभागाचे डॉ.मोहम्मद लईक, सहयोगी प्राध्यापक डॉ.शिल्पा शेवाळे, सहायक प्राध्यापक तसेच विभागातील इतर अधिकारी आणि मृताचे नातेवाईक उपस्थित होते. तसेच विभागातील कर्मचारी मिर्झा युनुस बेग, महाजन, मार्टीन अस्वले यांचे विशेष सहाकार्य केले, असे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अधिष्ठाता डॉ.शिवाजी सुक्रे यांनी कळविले आहे.


**मुख्याधिकारी नगर परिषद वैजापूर**

जा.क्र.नपवै/कावि/साबाविभाग/२०२४/३०८ दिनांक : १३/०२/२०२४

**ई-निविदा सूचना क्र. २० सन २०२३-२४**

वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत टेंडर आय.डी.क्र. 2024-DMA-1004273-1 कामासाठी ई निविदा मुख्याधिकारी नगर परिषद यांचेकडून मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील दि. १३/०२/२०२४ पासून ते दि. २०/०२/२०२४. पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे..

**स्वाक्षरीत/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वैजापूर**


## (पान १ वरुन)

### अशोक चव्हाण झाले भाजपवासी

यावर बाजूलाच बसलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना काँग्रेस नव्हे भाजपचे अध्यक्ष, अशी आठवण करुन दिली.

मी ३८ वर्षे काँग्रेसमध्ये राहिल्यानंतर आज नवीन सुरुवात करत आहे. विकासाच्या राजकारणाला आम्ही नेहमीच साथ दिली. देवेंद्र फडणवीस यांनी नेहमीच आम्हाला सकारात्मक साथ दिली. मी आजपर्यंत काँग्रेसचे प्रामाणिकपणे काम केले. यापुढे प्रामाणिकपणे भाजपचे काम करेन. राज्यात भाजपला अधिकाअधिक जागा कशा मिळतील, यासाठी मी प्रयत्न करेन. मी कोणावरही व्यक्तिगत टीका किंवा दोषारोप करणार नाही. पंतप्रधान मोदी देशाचा सबका साथ, सबका विकास करत आहेत. पक्षाकडून मला जे सांगितले जाईल, ते काम मी करेल. काँग्रेस पक्ष सोडणे हा माझा व्यक्तिगत निर्णय होता. मी कोणालाही माझ्यासोबत येण्यास सांगितलेले नाही, असे अशोक चव्हाण यांनी सांगितले. हा निर्णय माझ्यासाठी सोपा नव्हता. त्यासाठी मला खूप विचार करावा लागला. पण देशाच्या विकासासाठी, निर्मितीसाठी योगदान देता यावे, यासाठी मी भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला, असेही त्यांनी म्हटले.

### भारताची जगात विश्वबंधू म्हणून...

राजकारणही नवे होते. तेव्हा त्यांनी माझा सत्कार केला होता. तो सत्कार केवळ माझा नव्हता तर १४० कोटी भारतीयांचा होता. युएईतील प्रत्येक भारतीयाचा तो सत्कार होता. तो एक दिवस होता त्यानंतर आजचा एक दिवस आहे. पंतप्रधान झाल्यानंतर मी सातव्यांदा इथे आलोय,असे म्हणत पीएम मोदींनी २०१५ च्या आठवणींना उजाळा दिला. माझे भाग्य आहे की, युएईने त्यांच्या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित केले. हा केवळ माझाच सन्मान नाही. तर संपूर्ण भारत देशाचा सन्मान आहेत. आजही मी जेव्हा युएईच्या प्रमुखांना भेटतो तेव्हा ते भारतीयांचे कौतुक करतात. मी तुमच्याप्रती असलेले प्रेम अनुभवत असतो. मी अबूधाबीत एका मंदिरात प्रस्ताव ठेवला आणि त्यांनी क्षणार्धात होकार दिला. ज्या जमीनीवर तुम्ही रेष ओढचाल ती जमीन मी तुम्हाला देऊन टाकेन, असे ते मला म्हणाले, असेही मोदींनी स्पष्ट केले.

### शेतकरी आंदोलकांवर पोलिसांनी...

घालवायचा असतो. सरकारच्या प्रस्तावावर आम्ही विचार करू, मात्र आंदोलनावर ठाम राहू. दुसरीकडे केंद्रीय मंत्री अर्जुन मुंडा म्हणाले की, सर्व काही चर्चेने सोडवले पाहिजे. काही समस्या आहेत ज्यांचे निराकरण करणे आवश्यक आहे.

संयुक्त किसान मोर्चाने जारी केलेल्या पत्रात असे लिहिले आहे की, शेतकरी आणि कामगारांच्या २१ कलमी मागणी पत्राच्या समर्थनार्थ आम्ही १६ फेब्रुवारी २०२४ रोजी औद्योगिक आणि प्रादेशिक संपाची घोषणा केली आहे. तुमच्या सरकारला कारण समजेल या आशेने आम्ही तुम्हाला आमच्या अखिल भारतीय ग्रामीण भारत बंदच्या आवाहनावर पुन्हा एकदा लिहित आहोत. समस्या सोडवण्यासाठी तुम्ही ९ डिसेंबर २०२१ रोजी एख्श ला वचन दिले होते.

### अश्रुधुरांचा परतावा शेतकरी...

आपल्या न्याय हक्कासाठी लढत आहे आणि मोदी सरकार त्यांच्यावर अश्रूधुराचा मारा करत आहे.१० वर्ष शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारने काही केले नाही आणि आता शेतकरी आपला हक्क घेण्यासाठी रस्त्यावर उतरून मागणी करत असल्यामुळे त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न मोदी सरकार करत आहे. एकीकडे स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार शेतमालासाठी किमान आधारभूत किंमत देणार असल्याची घोषणा आमचे नेते राहुलजी गांधी यांनी केली आहे, तर दुसरीकडे न्याय मागणाऱ्या शेतकऱ्यांना लाठ्या काठ्या देणारे केंद्रातील मोदी सरकार आहे. देशातील शेतकरी हे सगळं बघत असून ह्या अश्रुधुरांचा परतावा तो केंद्र सरकारला व्याजासह देईल.'

### सच्चा शिपाई कधी मैदान सोडत नाही

करणार नाही. अशोक चव्हाण यांनी सांगायला हवं, की त्यांच्यावर ईडीचा, सीबीआयचा दबाव आहे? काँग्रेसमध्ये काही अडचण होती का? त्यांनी कुठलंही कारण पक्ष सोडताना सांगितलं नाही.भाजप वॉशिंग मशीन आहे का? भाजपने ज्यांच्यावर आरोप केले भाजपमध्ये गेले. व्हाईट पेपरमध्ये आदर्श घोटाळाबद्दल बोलले, मोदी आणि अमित शाह यांना जे कोणी भेटतं ते पापमुक्त होतात. आज माझी बैठक झाली, राज्यातील वरिष्ठ नेत्यांसोबत बैठक झाली. अशोक चव्हाण यांनी पक्ष सोडण्याचं कारण सांगावं. ही त्यांची जबाबदारी आहे. नांदेडचे नगरसेवक आम्हाला भेटायला आले. त्यांना सुद्धा चव्हाण यांनी सांगितलं नाही पक्ष प्रवेश बद्दल. आम्ही कमजोर होणार नाही, अजून ताकदीने लढू. मी उद्धव ठाकरे शरद पवार यांच्याशी बोललो, ते सुद्धा आपल्यासोबत आहे. उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांची भेट घेतली, आम्ही सगळे महाविकास आघाडी म्हणून काम करणार आहोत, महाराष्ट्रात महाविकास आघाडी मजबुतीने पुढे जात आहे, अशोक चव्हाण यांच्या राजीनाम्याने काही फरक पडणार नाही, असं चेन्नीथला म्हणाले.


**नगर परिषद वैजापूर जि.छत्रपती संभाजीनगर**

**फोन नंबर (०२४३६-२२२०३६) फॅक्स नंबर (०२४३६-२२५२५६)**

**Email : npvaijapur@gmail.com**

**जा.क्र.नपवै/कावि/६/२०२४/३०९ दिनांक : १३/०२/२०२४**

**निविदा सुचना**

वैजापूर नगर परिषद, वैजापूर हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाची खालील दर्शविलेल्या कामासाठी अनुभवी योग्यत्या वर्गातील नोंदणीकृत गुत्तेदाराकडून/एजन्सी धारकाकडून निविदा मागवित आहे. कोरे निविदा फॉर्म सुटीचे दिवस वगळून **दि.२१/०२/२०२४** पर्यंत कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत खालील प्रमाणे निश्चित किंमत जमा केल्यानंतर नगर परिषद कार्यालयात सार्वजनिक बांधकाम विभागात विकत मिळतील.

१) गुत्तेदाराने मोहोरबंद निविदा दोन लिफाफा पद्धतीत मुख्याधिकारी, नगर परिषद वैजापूर यांचेकडे **दिनांक २२/०२/२०२४** रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. २) निविदा सोबत बयाणा रक्कम रोख जमा करणे आवश्यक आहे. ३) धनादेश किंवा दर्शनी हुंडी स्वीकारली जाणार नाही. ४) जमा केलेल्या बयाणा रकमेचा पावती क्रमांक सिलबंद पाकीटावर नमुद करावा. ५) बयाणा रक्कमे शिवाय निविदा स्विकारली जाणार नाही. ६) प्राप्त झालेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी ठिक ५.०० वा. मा.मुख्याधिकारी यांच्या दालनात उपस्थिता समक्ष उघडण्यात येतील. ७) मान्य निविदा धारकाच्या बिलातून अनामत, आयकर, GST, कामगार उपकर, रॉयल्टी इत्यादीची नियमानुसार कपात करण्यात येईल. ८) इतर अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळून न.प.बांधकाम विभागात विनामुल्य पहावयास मिळतील. ९) खालील कामासाठी (Price Escal Action) Clause लागु राहणार नाही. १०) भारत सरकार राजपत्र दि.८/१/२०२१ नुसार EPF रजिष्ट्रेशन बंधनकारक राहील. ११) कोणतीही निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार न.प.ने राखुन ठेवला आहे.

**कामाचा तपशिल खालील प्रमाणे.**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | बयाना रक्कम | अनामत रक्कम | टेंडर फोर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैजापूर येथील बेळगाव रस्त्यावरील सामाजिक सभागृहासाठी सुरक्षा भिंत बांधकाम करणे. ता. वैजापूर जि.छ.संभाजीनगर | ८४५७२९ | १६९१५ | ६७६५८ | १००० | ६ महिने |
| २ | वैजापूर येथील बेळगाव रस्त्यावरील सामाजिक सभागृहा समोर पेव्हर ब्लॉक बसविणे. ता. वैजापूर जि.छ.संभाजीनगर | ४१९७७० | ८३९५ | ३३५८२ | ५०० | ३ महिने |
| ३ | शहरातील काटेरी झाडे काढणे, माती लोटणे व कॅनाल साफ सफाई करण्यासाठी जे.सी.बी. धारकाची नियुक्ती करणे. | -- | २००० | -- | ३०० | १ वर्ष |
| ४ | शहरातील विविध सार्वजनिक शौचालय देखभाल दुरुस्तीसाठी व लावण्यात आलेल्या झाडांना टँकर पाणी पुरवठा करणे | -- | २००० | -- | ३०० | १ वर्ष |
| ५ | शहरातील विंधन विहिरीवरील हातपंप दुरस्ती करणे | -- | २००० | -- | ३०० | १ वर्ष |
| ६ | विविध विकास कामाची ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळवर प्रसिद्ध करणे | --- | १००० | -- | ३०० | १ वर्ष |

स्वाक्षरीत/-
**(ए.एम.सोनवणे)**
**कनिष्ठ अभियंता**
**नगर परिषद वैजापूर**

स्वाक्षरीत/-
**(प्रकाश पाटील)**
**नगर अभियंता**
**नगर परिषद वैजापूर**

स्वाक्षरीत/-
**(बि.यु. बिघोत (राजपुत))**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वैजापूर**